







# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९–५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. २३.०९.२०२५ | अंक नं. १४७ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020













# नगर शहरासह जिल्ह्याच्या दक्षिण भागात सलग तिसऱ्या दिवशीही पावसाचा धुमाकूळ

## नद्या, नाल्यांना पूर, रस्ते पाण्याखाली, अनेक ठिकाणी वाहतूक झाली पूर्णतः विस्कळीत

नगर – नगर शहरासह जिल्ह्याच्या दक्षिण भागात गेल्या ३ दिवसांपासून मुसळधार पावसाने चांगलाच धुमाकूळ घातला आहे. त्यामुळे नद्या, नाल्यांना पूर आला असून अनेक ठिकाणी रस्ते पाण्याखाली गेले आहेत. त्यामुळे अनेक ठिकाणी वाहतूक पूर्णतः ठप्प होवून जनजीवन विस्कळीत झाले आहे. सीना नदीला आलेल्या पुरामुळे नगर कल्याण रस्त्यावरील वाहतूक तर सुमारे ४८ तासांपासून ठप्प झालेली आहे.

नगर जिल्ह्यात २० सप्टेंबर पासून पाऊस कोसळत आहे. २१ सप्टेंबरला रात्रभर नगर दक्षिणेतील विविध तालुक्यात ढगफुटीसदृश पाऊस झाला असून पाथर्डी, शेवगाव, नगर आणि जामखेड तालुक्यातील २४ महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली आहे. यातील बहुतांशी ठिकाणी यापूर्वी झालेल्या अतिवृष्टीच्या भागात पुन्हा तुफानी पाऊस झाला असून यामुळे नदी, नाले, ओढे यांना पूर आला असून अनेक ठिकाणी नुकसानीचा आकडा वाढताना दिसत आहे. यामुळे झालेल्या शेतीसह अन्य नुकसानीचे पंचनामे कसे करावेत, असा प्रश्न महसूल आणि कृषी विभागाला पडला आहे. त्यातच २२ सप्टेंबरला सायंकाळपासून पुन्हा पावसाचे थैमान सुरु झाले. नगर शहर परिसरात सायंकाळी मुसळधार पाऊस कोसळला. २३ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजे पर्यंतच्या २४ तासांत सावेडी, केडगाव, वाळकी, रुईछत्तीसी, नेप्ती या ५ महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली आहे.

जिल्हा प्रशासनाने दिलेल्या आकडेवारी नुसार नालेगाव मंडळात ३९.० मिमी, सावेडी ८४.० मिमी, कापूरवाडी ४६.३ मिमी, केडगाव ७०.५ मिमी, भिंगार ४९.३ मिमी, नागापूर ३२.० मिमी, जेऊर ४३.०, चिचोंडी पाटील ४७.३ मिमी, वाळकी ६९.३, चास ४४ मिमी, रुईछत्तीसी ६७.८ मिमी, नेप्ती ७०.८ मिमी अशी नगर तालुक्यात एकूण ५३.३ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

### पाथर्डी, शेवगाव, जामखेड तालुक्यात परिस्थिती बिकट

जिल्ह्यातील पाथर्डी, शेवगाव तसेच जामखेड तालुक्यात अनेक ठिकाणी अतिवृष्टी झाल्याने परिस्थिती बिकट झाली आहे. पाथर्डी तालुक्यात ९१.७ मिमी, शेवगाव तालुक्यात १२०.६ मिमी तर जामखेड तालुक्यात ८५.२ मिमी पावसाची नोंद झाली आहे. या शिवाय नगर ५३.३ मिमी, पारनेर ३७.० मिमी, श्रीगोंदा ३६.० मिमी, कर्जत ५३.५ मिमी, नेवासा ४४.१ मिमी, राहुरी १८.३ मिमी, संगमनेर १०.८ मिमी, अकोला ३.० मिमी, कोपरगाव १८.९ मिमी, श्रीरामपूर २०.९ मिमी, राहाता २०.४ मिमी असा पाऊस नोंदवला आहे.

दरम्यान, पाथर्डी तालुक्यात सततच्या पावसाने हाहाकार माजवला आहे. तालुक्यातील अनेक गावात मोठे नुकसान झालेले असून तालुक्यात पावसात वाहून गेलेल्या व्यक्ती आणि जनावरांचा आकडा वाढतांना दिसत आहे.

शेवगाव तालुक्यात देखील मोठे नुकसान झाले असून सर्वत्र पूरपरिस्थिती होती. आखेगाव, भूगर, अमरापूर, ढोरजळगाव, वडुले, बोधेगाव यासह पाथर्डी तालुक्यातील कारेगाव– मोहटा रस्ता वाहून गेला आहे. नवरात्री उत्सवामुळे मोठ्या संख्याने भाविक रेणूकामाता देवीच्या दर्शनासाठी येत असून त्यांचे मोठे हाल होतांना यावेळी दिसून आले. अतिवृष्टी आणि सततच्या पावसाने शेवगाव– पाथर्डीत ओला दुष्काळाची परिस्थितीत निर्माण झाली आहे. *(छायाचित्र पान २ वर)*








**अहमदनगर सेंट्रल को ऑप. कंझ्युमर्स होलसेल ॲण्ड रिटेल स्टोअर्स लि..**

जीहा!

**HP GAS चे अधिकृत वितरक**

जुना दाणे डबरा, अहिल्यानगर ४१४००१. फोन : २३४५८५३

प्रिय ग्राहक,

ग्राहक भांडार हे हिंदूस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमीटेडचे अधिकृत एलपीजी वितरक असून आपल्या ग्राहकांना सूचित करते की, एलपीजी सेवा खंडीत होऊ नये यासाठी बायोमेट्रीक ई–केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे अत्यावश्यक आहे.

ई–केवायसी प्रक्रिया पूर्ण करणेची अंतीम मुदत **३० सप्टेंबर २०२५,** या तारखेनंतर आपले एलपीजी कनेक्शन कंपनीतर्फे बंद केले जाईल. **ई–केवायसीची कार्यालयीन वेळ** – सकाळी ९.०० ते दुपारी ५.०० पर्यंत.

* **आपले आधार कार्ड लिंक नसल्यास खालील कागदपत्रे द्यावीत.** – १) आधार कार्ड झेरॉक्स २) बँक पासबुक झेरॉक्स ३) गॅस कुपन झेरॉक्स. गॅस ग्राहकाने रिफील सिलेंडर घेण्यासाठी बुकींग करणे अत्यंत आवश्यक आहे. * बुकींग शिवाय आपणांस गॅस सिलेंडर मिळणार नाही. * बुकींग केल्यानंतर आपणांस रजिस्टर मोबाईल नंबरवर ओटीपी येईल. * ओटीपी दिल्याशिवाय रिफील सिलेंडर मिळणार नाही. * आमचे गॅस वाहक आपणाकडे सिलेंडर देणेस आल्यावर त्यांना ओटीपी नंबर देण्यात यावा. * ओटीपी शिवाय सिलेंडर मिळणार नाही.

**कृपया वरील बाबींची ग्राहकांने नोंद घेणे.**

**सुरेंद्र भंडारी**
(जनरल मॅनेजर)

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक




# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## अपघात झाल्याने मदत करण्याच्या बहाण्याने महिलेचे सोन्याचे दागिने चोरले

नगर - रस्त्याने पायी चाललेल्या महिलेला दुचाकीने धडक दिल्याने त्या रस्त्यावर पडून जखमी झाल्या, त्यांना उपचारासाठी दवाखान्यात घेवून जात असताना त्या दुचाकीस्वाराने हातचलाखीने त्यांच्या गळ्यातील अडीच तोळे वजनाचे सोन्याचे गंठण चोरून नेल्याची घटना तारकपूर रोडवर २१ सप्टेंबर रोजी सकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत दिपाली जालिंदर जासूद (वय ५३, रा. ओंकारनगर, केडगाव) यांनी २२ सप्टेंबर रोजी दुपारी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या फिरोदिया यांच्या बंगल्याच्या पाठीमागील बाजूस असलेल्या तारकपूर रोड ने पायी जात असताना एका अनोळखी दुचाकीस्वाराने त्यांना धडक दिली. त्यामुळे त्या रस्त्यावर खाली पडल्या. त्या दुचाकीस्वाराने त्यांना उठवून बाजूला बसविले. त्यानंतर त्यांना दवाखान्यात चला असे म्हणून दुचाकीवर बसवून दवाखान्यात नेले. त्यानंतर तो तेथून निघून गेला. थोड्या वेळाने प्राथमिक उपचार घेतल्यानंतर त्यांच्या गळ्यातील अडीच तोळे वजनाचे सोन्याचे गंठण त्यांना दिसून आले नाही. त्यांनी आजूबाजूला शोध घेवूनही ते न सापडल्याने त्या अनोळखी दुचाकीस्वाराने मदत करण्याच्या बहाण्याने हातचलाखी करत सदर गंठण चोरून नेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर ही बाब त्यांनी कुटुंबियांना सांगितली व कुटुंबियांच्या समवेत तोफखाना पोलीस ठाण्यात जावून फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात संशयित दुचाकीस्वाराविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# अतिवृष्टीमुळे नुकसानीच्या भरपाईसाठी शासनाकडून २२१५ कोटींची मदत जाहीर

### राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय, मदत आणि पुनर्वसन विभागाकडून शासन आदेश जारी

मुंबई - राज्यात यावर्षी अतिवृष्टी मुळे शेती पिकांचे मोठे नुकसान झालेले असून या नुकसानीच्या भरपाई साठी राज्य मंत्री मंडळाने २२१५ कोटी रुपयांची मदत जाहीर केली आहे. २३ सप्टेंबर रोजी झालेल्या मंत्री मंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून मदत आणि पुनर्वसन विभागाने याबाबतचा शासन निर्णयही जाहीर केला आहे. ही रक्कम आजपासूनच वितरीत केली जाणार आहे.त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे. गेल्या काही दिवसांत झालेल्या अतिवृष्टीने राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. यामध्ये मराठवाड्यासह विदर्भातील शेतकरी सर्वाधिक बाधित झाले होते. सरकारने केलेल्या पंचनाम्यानुसार, एकूण ३१ लाख ६४ हजार शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याचे समोर आले आहे. या शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी सरकारने तातडीने पाऊल उचलले आहे.

#### जून ते ऑगस्टमधील नुकसानीसाठी असणार मदत

पिकांच्या नुकसानीमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले होते. अशा परिस्थितीत त्यांना दिलासा देण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतला आहे. जाहीर झालेली मदत आजच वितरित केली जाणार असून, यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या नुकसानीची भरपाई मिळण्यास मदत होईल. मराठवाड्यासह राज्यातील ज्या-ज्या भागात अतिवृष्टी झाली आहे, त्या सर्व भागांतील शेतकऱ्यांचा या मदतीमध्ये समावेश करण्यात आला आहे. जून २०२५ ते ऑगस्ट २०२५ या कालावधीत अतिवृष्टीने नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे झाले होते. त्याकरिता ही मदत असणार आहे.

#### कोणत्या विभागात किती मदत?

दरम्यान, जुलै महिन्यापासून छत्रपती संभाजीनगरमध्ये ७२१ कोटी, नाशिकमध्ये १३.७७ कोटी रुपयांची मदत देण्यात आली आहे. ऑगस्टमध्ये पुणे विभागासाठी १४.२९, नागपूर विभागाला २३.८५ कोटी आणि अमरावती विभागाला ५६५.६० कोटी रुपयांची मदत देण्यात आली आहे. तर कोकणाला १०.५३ कोटी रुपये देण्याचे निर्देश देण्यात आले होते. ही सगळी मिळून राज्य सरकारने खरीप हंगामासाठी आतापर्यंत २२०० कोटी रुपये देण्याचे निर्देश दिले असल्याचे मंत्री मकरंद पाटील यांनी सांगितले होते.

#### शेतकऱ्यांना पैसे मिळण्यासाठी दहा ते बारा दिवसांचा कालावधी

राज्य सरकारच्या वतीने शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी २ हजार २१५ कोटींची मदत आतापर्यंत रिलीज करण्यात आली आहे. मात्र हे सर्व पैसे एकाच जीआरने नाही तर वेगवेगळ्या प्रकारच्या जीआरच्या माध्यमातून देण्यात येत आहे. तसेच ही प्रक्रिया अद्याप थांबलेली नाही. वाटप झाल्यानंतर देखील शेतकऱ्यांना पूर्ण पैसे मिळण्यासाठी दहा ते बारा दिवसांचा कालावधी लागेल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे.

# नागरिकांचे जीव जाण्याची वाट जिल्हा प्रशासन पाहत आहे काय?

### ठाकरे शिवसेनेचा जिल्हाधिकारी, मनपा आयुक्तांना सवाल; महामार्गावरील पथदिवे, रस्ते दुरुस्त करा



नगर - पत्रकार चौक ते एमआयडीसी या नगर मनमाड रोड आणि डीएसपी चौक पासून ते शेंडी बायपास कडे जाणाऱ्या नगर छत्रपती संभाजीनगर महामार्ग यावरील स्ट्रीट लाईट हे गेल्या अनेक दिवसांपासून बंद आहेत. गेल्या काही दिवसांपासून, विशेषत: छत्रपती संभाजीनगरकडे जाणाऱ्या मार्गाची अत्यंत दुरावस्था झालेली आहे. त्यातच काळोखा मुळे नागरिकांचे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. विशेषत: दुचाकी स्वारांना त्याचा प्रचंड त्रास होत आहे. प्रशासन नागरिकांचे जीव जाण्याची वाट पाहत आहे काय ? असा सवाल ठाकरे शिवसेनेचे शहर प्रमुख किरण काळे यांनी केला आहे. जिल्हाधिकारी, मनपा आयुक्तांना लेखी निवेदन देत महामार्गावरील पथदिवे, रस्ते दुरुस्तीची करण्याची मागणी शिवसेनेच्या वतीने केली आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे, छत्रपती संभाजीनगर महामार्गावर असणाऱ्या जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, तसेच महानगरपालिका कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय यासारख्या अत्यंत महत्त्वाच्या प्रशासकीय आस्थापना आहेत. जलसंपदा विभाग, बांधकाम विभाग, वन विभाग, जिल्हा न्यायालय, खाजगी हॉस्पिटल्स यासारखी अन्य वरदळीची ठिकाण या मार्गवर आहेत. शेकडो, हजारो लोक दिवस भरामध्ये विविध कामांसाठी या मार्गावरून ये जा करत असतात. मात्र सदर रस्त्याची अवस्था ही प्रचंड दयनीय झाली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांचा या ठिकाणी वावर असून देखील या रस्त्याकडे दुर्लक्ष होते हे अत्यंत खेदजनक आहे. ही अवस्था जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी असणाऱ्या प्रमुख कार्यालयांची असेल तर शहराच्या अन्य भागांबद्दल न बोललेले बरे. सबब तात्काळ या मार्गावर रस्त्यांची डागडुजी करून सदर रस्त्याचे दर्जेदार काम पूर्ण करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी काळे यांनी केली.

काळे यांनी पुढे म्हटले आहे, माळीवाडा बस स्टॅन्ड परिसरामध्ये असणारे स्ट्रीट लाईट हे अनेक वेळा बंद असतात. या परिसरामध्ये प्रवाशांची ये जा मोठ्या संख्येने असते. बस स्टँड असल्यामुळे महिला प्रवाशांची देखील मोठ्या प्रमाणावर ये जा असते. मात्र काही विशिष्ट लोक त्या ठिकाणी रात्रीच्या अंधारात उभे राहतात. त्यामुळे या परिसरामध्ये महिलांची कुचंबना होईल अशा प्रकारचे वातावरण असते. रात्रीच्या वेळी पूर्ण वेळ या परिसरातील पथदिवे चालू ठेवण्याबाबत संबंधितांना आदेश देण्याची मागणी शिवसेनेच्या वतीने केली आहे. याबाबत तात्काळ कार्यवाही न केल्यास शिवसेना स्टाईल आंदोलन छेडण्याचा इशारा ठाकरे शिवसेनेने दिला आहे.

## जिल्ह्यातील मुसळधार पावसामुळे परिस्थिती गंभीर, प्रशासनाला सतर्कतेचे आदेश; २२७ नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविले

#### पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची माहिती

नगर - नगर जिल्ह्यात २० सप्टेंबरपासून कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत नागरिकांना सर्वतोपरी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. प्रशासनाला सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले आहे. प्रशासन आणि स्थानिक नागरिकांच्या सतर्कतेमुळे २२७ नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले असल्याची माहीती पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

जिल्ह्यातील नगर तालुक्यातील कापूरवाडी, केडगाव, भिंगार, चिंचोडी, चास, श्रीगोंदा तालुक्यातील मांडवगण, कोळेगाव, कर्जत तालुक्यातील मिरजगाव, जामखेड तालुक्यातील जामखेड खर्डा, नान्नज, नायगाव, साकत, शेवगाव तालुक्यातील बोधेगाव चापडगाव, मुंगी, पाथर्डी तालुक्यातील पाथर्डी माणिकदौंडी, टाकळी, कोरडगाव, करंजी, तिसगाव, खरवंडी, अकोला अशा २४ महसूल मंडळात मुसळधार पावसाने हजेरी लावल्याने तालुक्यातील सर्व नद्या, ओढे, नाले यांना पाणी येऊन पूरग्रस्त परिस्थिती निर्माण झाली आहे.

मुसळधार पावसाने जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले असून, जीवितहानी होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश प्रशासनाला दिले असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याशी संपर्क साधून सर्व परिस्थिती जाणून घेतली आहे. प्रशासनाने अडकलेल्या नागरीकांच्या स्थलांतरास प्राधान्य दिले आहे. पावसाची अधिकची शक्यता लक्षात घेऊन पुणे येथून एनडीआी एफ पथक बोलावून बचाव कार्य सुरू करण्यात आले असल्याचे पालकमंत्री विखे यांनी सांगितले. पुढील काही दिवसांत पावसाची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने सतर्क राहून उपाययोजना कराव्यात. स्थलांतर करण्यात आलेल्या नागरिकांना सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्या असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मदतीच्या संदर्भात जिल्हा प्रशासनाला असलेल्या स्थायी आदेशाप्रमाणे कार्यवाही करावी. झालेल्या नुकसानीची अद्याप स्पष्ट आकडेवारी समोर आलेली नाही. मात्र सरसकट पंचनामे करण्याचे आदेश कृषी विभागाला देण्यात आले आहेत.

#### २२७ नागरिकांना सुरक्षितस्थळी हलवले

जामखेड-पाथर्डी सोलापूर मार्गावरील कुशल ट्रव्हल कंपनीच्या बसमधील ७० प्रवाशांची सुटका नगर महापालिका आणि जिल्हास्तरीय शोध व बचाव पथकाने केली. पाथर्डी तालुक्यातील कारेगाव शिवारातील पुरात अडकलेल्या ३ आणि पिंपळेगव्हाण-मधील एका व्यक्तीला तसेच खरमाटवाडीमधील २५ कोरडगावमधील ४५, कोळसांगवीमधील १२ व्यक्तिंची सुटका करण्यात आली आहे. जामखेड तालुक्यातील धनेगाव येथील खैरी नदीच्या पुरात अडकलेल्या एकाच कुटंबातील ४ आणि वंजारवाडी येथे खैरी नदीच्या पाण्याचा वेढा पडल्याने ३० व्यक्तीची सुटका महसूल प्रशासन आणि स्थानिक नागरीकांच्या मदतीने करण्यात आली. शेवगाव तालुक्यातील खरडगाव येथील १२ आखेगाव येथील २५ लोकांची सुटका करण्यात प्रशासन आणि स्थानिक नागरीकांना यश आले असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

#### मोहटादेवीला जाणाऱ्या भाविकांनी काळजी घ्यावी

श्रीक्षेत्र मोहटादेवी मंदिराकडे जाणार्या भाविकांनी विशेष काळजी घेण्याचे आवाहन पालकमंत्री विखे पाटील यांनी केले असून प्रशासनाला याभागात काळजी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. भाविकांनी सूचनांचे पालन करावे, असे आवाहन पालकमंत्री विखे पाटील यांनी केले आहे.

### चंद्रकला मुनोत यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - भिस्तबाग भागातील गजराज फॅक्टरी जवळील गोकुळनगर येथील रहिवासी चंद्रकला कांतीलाल मुनोत (शिराळ चिचोंडीवाला, वय ७८) यांचे २२ सप्टेंबर रोजी संध्याकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. २३ सप्टेंबर रोजी त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, सुन, नातवंडे असा परिवार आहे. ॲड. राजेंद्र शेलोत यांच्या त्या बहीण तर धीरज, निलेश, हर्षल, संजय यांच्या आत्या होत.

### देवीदास शिर्के यांचे अल्प आजाराने निधन



नगर - पेडगावचे माजी उपसरपंच देवीदास (काका) गणपतराव शिर्के (वय ४५) यांचे २२ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर २३ सप्टेंबर रोजी पेडगाव (ता.श्रीगोंदा) येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, पत्नी, मुलगा, मुलगी, ३ भाऊ, भावजया असा परिवार आहे. सतिश, दीपक व लक्ष्मीकांत शिर्के यांचे ते बंधू तर यश, रिया यांचे वडील होत.

### बाबासाहेब बोरुडे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - चिचोंडी पाटील येथील रहिवासी बाबासाहेब धर्मा बोरुडे (वय ५३) यांचे २२ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, १ मुलगी, ३ बहिणी, जावई असा परिवार आहे. अनिकेत, अभिषेक बोरुडे यांचे ते वडील होत.

### संपतलाल मुनोत यांचे अल्प आजाराने निधन



कुकाणा - कुकाणा (ता. नेवासा) येथील रहिवासी संपतलाल लालचंद मुनोत (वय ७८) यांचे २२ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर कुकाणा अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. प्रगत शेतकरी केंद्राचे ते संचालक होते.

### श्रीमती नर्मदाबाई राठी यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर - येथील श्रीमती नर्मदाबाई मोहनलाल राठी (वय ८५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, पाच मुली, दिर, पुतणे, जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.

बेलापूर येथील शेतकरी राजेश राठी व पुणे येथील उद्योजक रत्नेश राठी यांच्या मातोश्री, जगन्नाथ, रमेशचंद्र, श्रीवल्लभ व प्रकाशचंद्र राठी यांच्या भावजई होत.

# नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्या

### जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या सूचना; आरोग्य विभागाच्या कामकाजाचा घेतला आढावा

नगर - आरोग्य विभागातील प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांनी दक्षता आणि संवेदनशीलतेने काम करून नागरिकांना उत्तम आरोग्य सेवा उपलब्ध करून द्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत त्यांनी आरोग्य विभागाच्या कामकाजाचा आढावा घेतला.

यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय घोगरे, जिल्हा आरोग्य अधिकारी बापूसाहेब नागरगोजे, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शिवकुमार वलांडे, जिल्हा माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. विनोद काकडे, डॉ.फुंड, ॲड. सारिका सुरासे आदी उपस्थित होते.



जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आरोग्य विभागाच्या कामकाजाचा आढावा बैठकीत बोलताना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया.

डॉ. आशिया म्हणाले की, जिल्ह्यात मुला-मुलींच्या लिंग गुणोत्तराचे प्रमाण संतुलित ठेवण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावरील समित्यांनी व्यापक जनजागृती मोहीम राबवावी. मुलींच्या जन्माबाबत कार्यशाळांचे आयोजन करावे. अवैधरित्या गर्भलिंगनिदान करणाऱ्या केंद्रांवर माहिती मिळताच कडक कारवाई करावी. जिल्ह्यातील जन्म-मृत्यूची नोंद वेळेत व्हावी, याची काळजी घ्यावी. तसेच खासगी दवाखाने व प्रसूतीगृहांना नियमित भेटी देऊन आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत आवश्यक नोंदी संकलित कराव्यात, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

क्षयरोग निर्मूलनासाठी संशयित रुग्णांचे लवकर निदान आणि योग्य उपचार करणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी क्षयरुग्णांच्या तपासणीची संख्या वाढवावी. सर्व रुग्णालयांमध्ये क्ष-किरण कॅम्पचे आयोजन करावे. सकारात्मक अहवाल आलेल्या रुग्णांवर तातडीने उपचार सुरू करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

डेंग्यू, चिकुनगुनिया, मलेरिया अशा आजारांचा प्रतिबंध करण्यासाठी महानगरपालिका क्षेत्र आणि मोठ्या गावांमध्ये आरोग्य कर्मचाऱ्यांनी नियमित गृहभेटी घ्याव्यात. डास निर्मूलनासाठी कीटकनाशक फवारणी, साचलेले पाणी हटवणे आणि परिसर निर्जंतुक ठेवण्यावर भर द्यावा. शासकीय दवाखान्यांमध्ये येणाऱ्या रुग्णांची आयुष्मान भारत योजनेअंतर्गत नोंदणी करावी. यासाठी आरोग्यमित्रांची मदत घ्यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी नमो नेत्र संजीवनी, स्वस्थ नारी - स्वस्थ परिवार या अभियानांचा आढावाही घेतला.

बैठकीस सर्व आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकारी तालुका दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.



सलग तिसऱ्या दिवशी शहर परिसरात झालेल्या मुसळधार पावसाने सीना नदीला आलेला पूर

### महामार्गाच्या कडेला आढळला मृतदेह

नगर - नगर पुणे महामार्गाच्या कडेला चास शिवारात असलेल्या सेल पेट्रोलपंपाजवळ एका अंदाजे ४५ वर्षीय अनोळखी इसमाचा मृतदेह २२ सप्टेंबर रोजी आढळून आला आहे. एक व्यक्ती रस्त्याच्या कडेला बेशुद्धावस्थेत पडलेला असल्याची माहिती नगर तालुका पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी भेट देत रुग्णवाहिका बोलावून त्यास उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठविले. तेथील मेडिकल ऑफिसर डॉ. वाघ यांनी त्यास तपासून उपचारापूर्वीच मयत घोषित केले. याबाबतच्या अहवालावरून नगर तालुका पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. या मयत इसमाची ओळख पटविण्याचा प्रयत्न पोलिसांनी सुरु केला असून या व्यक्ती किंवा त्याच्या नातेवाईकांबाबत काही माहिती असल्यास नगर तालुका पोलीस स्टेशन किंवा पो.हे.कॉ. एस बी दाते (मो. ९६८९२४१२०६) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

### पो.नि. दराडे नियंत्रण कक्षात, कोकरेंकडे कोतवालीचा पदभार

नगर - महिलेवर अत्याचाराचा गुन्हा दाखल झालेले पोलिस निरीक्षक प्रताप दराडे यांना नियंत्रण कक्षात हजर होण्याचे आदेश पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिले आहेत. कोतवाली चा तात्पुरता पदभार तोफखाना पोलीस ठाण्याचे पो.नि. आनंद कोकरे यांच्या कडे देण्यात आला आहे. मुंबई येथील ३० वर्षीय महिलेने दिलेल्या फिर्यादी वरून दराडे यांच्या वर २२ सप्टेंबर रोजी अत्याचाराचा गुन्हा तोफखाना पोलीस ठाण्यात दाखल झाला असून त्याचा तपास पालघर पोलिसांकडे वर्ग करण्यात आला आहे. त्यानंतर पोलीस अधिक्षक घार्गे यांनी हे आदेश काढले आहेत. तसेच या गुन्ह्यासंदर्भात अहवाल नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्याकडे सादर करण्यात येणार असल्याचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी सांगितले.

# सकल राजस्थानी युवा मंचच्यावतीने २८ सप्टेंबरला वधू वर परिचय संमेलन

नगर - सकल राजस्थानी युवा मंचच्यावतीने २८ सप्टेंबर रोजी नगरमधील बडीसाजन मंगल कार्यालयात निःशुल्क वधूवर परिचय संमेलनाचे आयोजन केले आहे. सन १९९५ ते सन २००० या कालावधीत जन्मलेल्या युवक युवतींना यात सहभागी करून घेतले जाणार आहे. तब्बल २८० युवक युवतींनी या संमेलनासाठी नोंदणी केली आहे. प्रत्येकाला अनुरुप जोडीदार मिळण्यासाठी मंचने युवकांचे बायोडाटा तयार केले आहेत. सर्व युवतींना त्यांच्या प्रोफाईलनुसार युवकांचे बायोडाटा उपलब्ध करून दिले जातील. विशेष म्हणजे या संमेलनात युवतींना जाहीर व्यासपीठावर येवून आपली माहिती देण्याची गरज असणार नाही. युवतींना जो बायोडाटा पसंत पडेल त्याच युवकाशी त्यांचा वैयक्तिक संवाद घडवून आणण्यात येईल. युवकांना सर्व नियमावली समजून देत संमेलनाची प्रतिष्ठा कायम राहिल अशाच युवकांना संमेलनात सहभागी करून घेण्यात आले आहे. माहितीसाठी धनेश कोठारी (मो. ९४२३७९१५९५), संदेश मुनोत (मो.७३७८८८८१८८), संदीप ओस्तवाल (मो. ७३५०१७०२७०).

# अहमदनगर महाविद्यालयात ७ ऑक्टोबर रोजी वक्तृत्व स्पर्धा

नगर - बी.पी.एच.ई. सोसायटीच्या अहमदनगर महाविद्यालयाच्या वतीने ७ ऑक्टोबर रोजी रूथबाई हिवाळे वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात मराठी आणि इंग्रजी अशा दोन्ही भाषेत ही स्पर्धा पार पडणार आहे. कनिष्ठ महाविद्यालय गट (इ. ११ वी व इ. १२) साठी एक आणि (इ. ९ वी व इ. १० वी) चा शालेय गट अशा दोन गटात ही स्पर्धा घेण्यात येणार आहे. यावेळी स्मृती करंडकासोबतच रोख रक्कम हे या वर्षीच्या स्पर्धेचे मुख्य आकर्षण आहे. स्पर्धेचे यंदाचे रौप्य महोत्सवी वर्ष आहे.

अहमदनगर महाविद्यालयाचे संस्थापक व प्रथम प्राचार्य रेव्ह. डॉ.भा.पा.हिवाळे यांच्या पत्नी, रूथबाई हिवाळे यांच्या स्मरणार्थ कनिष्ठ महाविद्यालयस्तरावर ही स्पर्धा घेतली जाते. तर इंग्रजी माध्यमातून होणारी ही स्पर्धा प्रा.जोसेफ बार्णबस यांना समर्पित करण्यात येणार आहे.

आवडता विषय घेऊन यंदाच्या स्पर्धांमध्ये शाळा आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन प्रभारी प्राचार्य डॉ.नोएल एफ. पारगे, उपप्राचार्य प्रतुल पी.कसोटे, पर्यवेक्षिका उज्वला एन.गायकवाड यांनी केले आहे.

स्पर्धेसंदर्भात माहितीसाठी प्राध्यापकांच्या भ्रमणध्वनी क्रमांकावर प्रा.जे जी घुमरे ९८३४१०३२४१, प्रा.व्ही.व्ही. कसबेकर ९९२३६०८४२२, प्रा.डी.के.शिंदे ९५४५८४७१०८, प्रा.एस.बी. कांबळे ९९२२२२७२८६.



स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियानाचा प्रारंभ आरोग्यवर्धिनी उपकेंद्र नवनागापूर येथे दिपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी नवनागापूर ग्रामपंचायतचे सरपंच डॉ. बबनराव डोंगरे, सदस्य सागर सप्रे, गोविंद दळवी, पराग चितांबर, सतीश डोरले, मंगेश नजन, वैशाली गायकवाड, उज्वला थोरात, आरती पवार, अश्विनी जगधने, ऋतुजा दहिफळे, अंगणवाडी सेविका, आशा सेविका उपस्थित होते. (हेमंत ढाकेफळकर)

## स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियानास प्रारंभ

नगर – प्राथमिक आरोग्य केंद्र देहरे अंतर्गत आरोग्यवर्धिनी उपकेंद्र नव नागापूर व नवनागापूर ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमानाने स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियानास महिलांचा प्रतिसाद लाभला. जिल्हा परिषद आरोग्य विभागाचे नियोजन आणि आरोग्य कर्मचाऱ्यांची यावेळी साथ लाभली.

आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय भारत सरकार विभागामार्फत स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियानाची सुरुवात करण्यात आली.

२ ऑक्टोबर पर्यंत हे स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय भारत सरकार विभागामार्फत राबवले जात आहे. सर्व महिलांसाठी तपासणी व आरोग्य सेवा, निरोगी जीवनशैली व पोषण, आरोग्य सेवा घेणे सोपे करण्यासाठी तसेच नागरिकांचा सक्रिय सहभाग या विविध मुद्द्यांवर केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेंद्र कसबे यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी नव नागपूर ग्रामपंचायत चे सरपंच डॉ. बबनराव डोंगरे, ग्रामपंचायत सदस्य सागर सप्रे, गोविंद दळवी, सतीश डोरले, मंगेश नजन, पराग चितांबर, वैशाली गायकवाड, उज्वला थोरात, आरती पवार, अश्विनी जगधने, ऋतुजा दहिफळे तसेच सर्व आशा सेविका अंगणवाडी सेविका उपस्थित होते.

# घर घर लंगर सेवेचा पूरग्रस्तांना मदतीचा हात; पूरग्रस्त कुटुंबांना जीवनावश्यक साहित्य वाटप

### पंजाबनंतर आता जिल्ह्यातील पूरग्रस्तांना आधार देण्याचे कार्य सुरु; आपत्तीग्रस्तांच्या पाठीशी सेवा



घर घर लंगर सेवेचा पूरग्रस्तांना मदतीचा हात देत पूरग्रस्त कुटुंबांना जीवनावश्यक साहित्य वाटप करण्यात आले.

नगर – आपत्तीच्या काळात मदतीला धावून जाणाऱ्या गुरु अर्जुन देव सामाजिक प्रतिष्ठान संचलित घर घर लंगर सेवा ने पाथर्डी तालुक्यातील करंजी गावातील पूरग्रस्त कुटुंबांना मदतीचा हात दिला आहे. अलीकडील पुरामुळे करंजी येथील १६ घरे पूर्णपणे वाहून गेली असून, कुटुंबीयांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. या संकटग्रस्त कुटुंबांना आधार देण्यासाठी लंगर सेवेच्या वतीने स्वयंपाकघरातील साहित्य व भांडी वाटप करण्यात आले.

करंजी येथील उत्तरेश्वर मंदिराच्या प्रांगणात हा मदत वाटप कार्यक्रम पार पडला. स्वयंपाकघरातील साहित्य, भांडी आणि अन्य आवश्यक वस्तू मिळाल्याने पूरग्रस्त कुटुंबांना तात्पुरता दिलासा मिळाला आहे. या कार्यात हरजीतसिंह वधवा, प्रीतपालसिंह धुप्पड, गुलशन कंत्रोड, प्रशांत मुनोत, सुनील थोरात, अनीश आहुजा, कैलाश नवलानी, सनी वधवा, करण धुप्पड, किशोर रंगलानी, मुन्ना जग्गी, राजू जग्गी, सोमनाथ चिंतामणी, अस्नूर धुप्पड या सेवादारांनी सक्रिय सहभाग घेतला.

या कार्यक्रमासाठी माजी सभापती मिर्झा मनियार, सरपंच रफिक शेख, माजी ग्रामपंचायत सदस्य छगनराव क्षेत्रे, सुभाष अकोलकर, दत्तकृपा मेडिकलचे संचालक बाळासाहेब अकोलकर, डॉ. चंद्रशेखर अकोलकर आदी उपस्थित होते.

गुरु अर्जुन देव सामाजिक प्रतिष्ठानची घर घर लंगर सेवा नेहमीच आपत्तीच्या वेळी मदतीला धावून जाते. यापूर्वी कोल्हापूर, सांगली व शेवगाव भागातील पूरग्रस्तांना मदत पोहोचवली होती. नुकतेच पंजाबमध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाल्यावर तेथेही मदत पोहोचवण्यात आली. पंजाबसाठी आतापर्यंत १०,००० कपडे, ओडोमॉस व मच्छर अगरबत्त्या, दूध पावडर पाठविण्यात आले असून, जनावरांचे खाद्य व औषधेही पाठविण्यात येणार आहेत.

गुरु अर्जुन देव सामाजिक प्रतिष्ठानकडून अहिल्यानगर शहरात दररोज संध्याकाळी गरजूंसाठी मोफत अन्नसेवा (लंगर सेवा) सुरु आहे. पूरग्रस्तांसाठी मदतीचे कार्य अद्यापही सुरु असून, इच्छुक दाते व समाजातील बांधवांनी या सेवेत हातभार लावण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या माध्यमातून अधिकाधिक कुटुंबांना तातडीची मदत पोहोचविण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला आहे.

# गरोदर महिला व शालेय विद्यार्थ्यांमध्ये पोषण आहाराची जागृती

### आदित्य बिर्ला कॅपिटल फाउंडेशन व स्माईल फाउंडेशनचा उपक्रम



नगर तालुक्यातील डोंगरगण व शहरातील लांडे स्थळ येथे आदित्य बिर्ला कॅपिटल फाउंडेशन व स्माईल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने गरोदर महिला व शालेय विद्यार्थ्यांसाठी पोषण आहार जनजागृती उपक्रम राबविण्यात आला.

नगर – नगर तालुक्यातील डोंगरगण व शहरातील लांडे स्थळ येथे गरोदर महिला व शालेय विद्यार्थ्यांसाठी पोषण आहार जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाचे आयोजन आदित्य बिर्ला कॅपिटल फाउंडेशन व स्माईल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने करण्यात आले होते.

या कार्यक्रमात गरोदर महिला व जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना योग्य व सकस आहाराचे महत्त्व समजावून सांगण्यात आले.

डॉ. सौरभ भापकर यांनी महिलांना दैनंदिन जीवनात सहज उपलब्ध होणाऱ्या अन्नपदार्थातून पोषण कसे मिळवावे याबाबत मार्गदर्शन केले. विशेषतः स्तनदा माता व गरोदर माता यांच्या आहार नियोजनाविषयी महिलांना सविस्तर माहिती देण्यात आली.

डॉ. सौरभ भापकर यांनी मातांसाठी आवश्यक अन्नघटक, फळे–भाज्या व प्रथिनांचे महत्त्व यावर भाष्य केले व विद्यार्थ्यांना सकस आहार, व्यायाम व आरोग्यसंपन्न जीवनशैलीबाबत मार्गदर्शन केले. रोजच्या धावपळीच्या जीवनशैलीत आपला आहार संतुलित ठेवणे किती आवश्यक आहे याची जाणीव उपस्थितांना करून देण्यात आली. प्रत्येक वयोगटातील व्यक्तीच्या आहाराचे नियोजन कसे करावे, जेणेकरून शरीराला आवश्यक जीवनसत्वे व ऊर्जा मिळू शकेल याचेही सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी अंगणवाडी सेविका सविता मुत्त्याल, ज्ञानेश्वर चेडे उपस्थित होते.



रामकृष्णा एज्युकेशनच्या विद्यार्थ्यांचे वाद स्पर्धेत यश मिळविल्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला.

## रामकृष्णा एज्युकेशनच्या विद्यार्थ्यांचे वाद स्पर्धेत यश

नगर – श्री रामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनच्या सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल व मोहनलाल रामावतार मानधना जुनियर कॉलेज–मधील विद्यार्थ्यांनी सारडा कॉलेजने आयोजित केलेल्या ज्ञानेश्वर करंडक वादस्पर्धेमध्ये उल्लेखनीय सहभाग नोंदवला. १२ वी विज्ञान शाखेतील प्रियांशु यादव व ११वी विज्ञान शाखेतील कु.आकांक्षा चतुर्वेदी या विद्यार्थ्यांनी ज्ञानेश्वर करंडक वाद स्पर्धेमध्ये मराठी भाषेमुळे मराठी माणसाचे चांगले होणार या विषयावरील दोन्ही बाजू हिंदी भाषेमध्ये उत्तमरीत्या मांडल्या. विशेषतः या दोन्ही विद्यार्थ्यांची मातृभाषा मराठी नसताना देखील त्यांनी विषयाच्या सर्व बाजूंनी विचार करून विविध अंगांनी मते मांडली. या स्पर्धेमध्ये कु. आकांक्षा चतुर्वेदी हिला वैयक्तिक तृतीय क्रमांकाचे बक्षीस मिळाले. बक्षिसाचे स्वरूप रुपये अकराशे व सर्टिफिकेट असे आहे. शाळेच्या हिंदी भाषेच्या शिक्षिका सौ. रीना रॉथेल यांनी या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले होते.

संस्थेचे अध्यक्ष श्रीगोपाल धूत, उपाध्यक्ष मोहनलाल मानधना, राजेश झंवर, सचिव डॉ. शरद कोलते, सहसचिव बजरंग दरक, शाळेच्या मुख्याध्यापिका, उपमुख्याध्यापिका, समन्वय व सर्व शिक्षक वृंदाने या दोघांचे कौतुक केले. संस्थेचे अध्यक्ष व शाळा समितीचे चेअरमन नंदकुमार झंवर यांनी विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले.



केडगाव येथील अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयातर्फे २० सप्टेंबर रोजी राज्यस्तरीय पोस्टर सादरीकरण स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. राज्यातील विविध भागांमधून आलेल्या विद्यार्थी–विद्यार्थिनींनी या स्पर्धेत १०० हून अधिक स्पर्धक, ५० प्राचार्य व ५० हून अधिक शिक्षक सहभाग घेतला.

# केडगाव येथील अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये राज्यस्तरीय पोस्टर सादरीकरण स्पर्धा उत्साहात

नगर – केडगाव येथील अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयातर्फे २० सप्टेंबर रोजी राज्यस्तरीय पोस्टर सादरीकरण स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. राज्यातील विविध भागांमधून आलेल्या विद्यार्थी–विद्यार्थिनींनी या स्पर्धेत १०० हून अधिक स्पर्धक, ५० प्राचार्य व ५० हून अधिक शिक्षक सहभाग घेतला.

औषधनिर्माण क्षेत्रातील नवनवीन संशोधन आणि संकल्पना या पोस्टरच्या माध्यमातून मांडण्यात आल्या. या स्पर्धेचे उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.विशाल पांडे व डॉ.रमेश सावंत, नॅशनल फार्मसी वेलफेअर असोसिएशन चे अध्यक्ष डॉ.सचिन कोतवाल, उपाध्यक्ष डॉ.अमोल शहा, सचिव डॉ.संपत नवले, उपसचिव प्रो.प्रवीण जावळे, कोषाध्यक्ष डॉ.वी.न जगताप यांच्या हस्ते झाले. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, अशा स्पर्धा विद्यार्थ्यांमधील संशोधक वृत्तीला प्रोत्साहन देतात आणि त्यांना भविष्यातील आव्हानांसाठी तयार करतात.

स्पर्धकांनी फार्मसी मध्ये AI चा वापर, एडवर्स ड्रग रिऍक्शन औषधांचे नवीन तंत्रज्ञान, फार्मासिस्टची भूमिका अशा विविध विषयांवर उत्कृष्ट पोस्टर्स सादर केली. परीक्षकांनी प्रत्येक पोस्टरचे बारकाईने परीक्षण करून विजेत्यांची निवड केली.

स्पर्धेचा निकाल : डी. फार्मसी – प्रथम क्रमांक : बक्षीस रु.५०००– तांजील खान, इफ्तात जिनाबाद, द्वितीय क्रमांक : रु.३००० – शिवम काळे, अश्रफ खान, तृतीय क्रमांक: रु.२००० – मकरंद जाधव, उत्तेजनार्थ: आरती जऱ्हाड, साक्षी दराडे

बी. फार्मसी – प्रथम क्रमांक: बक्षीस रु.५०००– ओजस्वी साळुंके, द्वितीय क्रमांक: रु.३००० कादंबरी सावंत, तन्मय ठुबे, तृतीय क्रमांक: रु.२०००– नमन सय्यद, शाहिद शेख

उत्तेजनार्थ: कांबळे ध्यानेश्वरी, भांगे आकांक्षा

विजेत्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्र देऊन गौरवण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डिप्लोमा प्रमुख प्रा.माधुरी पवार, प्रा.वृषाली गायकवाड यांनी केले. उपप्राचार्य वर्षाराणी आव्हाड यांनी आभार मानले.हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी शिक्षक, प्रा. पियूष जंगम, प्रा.जितेश बत्रा, प्रा. कांचन गलगटे, प्रा.शितल खंडागळे, प्रा.तृप्ती शिंदे, प्रा.सुधीर गर्जे, प्रा.रुचिता पवार, प्रा.स्नेहा कणसे, प्रा.भाग्यश्री रांधवण प्रा.मिलिंद क्षीरसागर, प्रा.निता येणारे, योगेश पंडित, अमोल बर्डे, अनिल गावडे, बाळासाहेब भागवत, अपर्णा पंडित, पल्लवी गुगळे, स्वाती भुजबळ, धनश्री गटने, सोनी मिश्रा, वैशाली शिंदे, शारदा भागवत, विद्यार्थी यांचे सहकार्य लाभले.

# महेश नागरी सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत



महेश नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, भिंगार या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत झाली.

नगर – महेश नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, भिंगार या संस्थेची ३६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा २० सप्टेंबर रोजी सायंकाळी ६.३० वा. भाग्यलक्ष्मी लॉन, भिंगार या ठिकाणी संस्थेचे विद्यमान चेअरमन डॉ. अशोक शांतीलाल चंगेडे यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

सभेच्या अध्यक्षस्थानी डॉ. अशोक चंगेडे होते. सभेच्या सुरुवातीला सहकार खात्याचे प्रशिक्षक प्रा. साखरे यांनी सभासदांना सोप्या भाषेत समजेल असे प्रशिक्षण दिले. सहकारी संस्थेतील सभासदांचे हक्क, कर्तव्य, जबाबदाऱ्या यावर सविस्तर माहिती दिली.

सभा सुरु करण्यापूर्वी अहिल्यानगर येथील प्रमुख पाहुणे मर्चंट बँकेचे माजी चेअरमन, महाराष्ट्र राज्य खो–खो असोसिएशनचे उपाध्यक्ष जिल्हा नागरी बँक असोसिएशनचे माजी अध्यक्ष सी. ए. अशोक पितळे व संस्थेचे संस्थापक नंदकुमार झंवर यांच्या हस्ते महेशाच्या प्रतिमेचे पुंजन व दिपप्रज्वलन करुन सभेस सुरुवात करण्यात आली

सभेस उपस्थित राहिल्याबद्दल सी. ए. अशोक पितळे यांचा संस्थेतर्फे चेअरमन डॉ. अशोक चंगेडे यानी सत्कार केला. त्यांनी त्यांच्या सत्कारास उत्तर देतांना त्यांच्या भाषणात संस्थेने चालु वर्षी केलेल्या कामगिरीबद्दल कौतुक केले तसेच पतसंस्थेने कमाल नफा वाटणीत १५% दराने लाभांश देण्याचे ठरविले. तसेच संस्थेने चालु वर्षी N.P.A. देखील कमी करण्यात यश मिळविलेले आहे. चालु नफ्यातुन ४७ लाखाचा नफा देखील संशयीत बुडीत निधी खाती वर्ग केला हेही अत्यंत चांगले केले. तसेच नंदकुमार झंवर यांनी पतसंस्थेबदद्ल बोलतांना सांगितले कि वाईट काळानंतरही पतसंस्था भक्कम पायावर उभी आहे. ही उल्लेखनीय बाब आहे.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. अशोक चंगेडे यांनी त्यांच्या मनोगतामध्ये पतसंस्थेला अहवाल वर्षी ७५.६६ लाख निव्वळ नफा झालेला आहे. निव्वळ नफ्यात ७.३९ लाखाने अहवाल साली वाढ झालेली आहे. दिवसेंदिवस नफ्यात वाढ होत आहे. पतसंस्थेने जुलै २०२५ अखेर कोल्ड स्टोअरेज माल ताराणवरील कर्ज ३ कोटी ३५ लाखाने दिलेले आहे. निव्वळ N.P.A. ०३.३५% आहे. संस्थेने चालु वर्षी नेत्र तपासणी शिबीर घेतले होते त्यामध्ये १२० रुग्णांची तपासणी करण्यात आली.

पतसंस्थेचे प्र.व्यवस्थापक राजेंद्र मेहेर यांनी सभेपुढे विषयपत्रिके प्रमाणे प्रत्येक विषय वाचुन आलेल्या सभासदांकडुन एकमताने सर्वच्या सर्व १२ विषय मंजुर करुन घेतले.

सभेमध्ये पतसंस्थेचे संचालक पवन गुंदेचा, कांतीलाल बोरा तसेच भिंगार अर्बन बँकेचे चेअरमन अनिल झोडगे, सुनिल राऊत यांनी मनोगत व्यक्त केले.

सूत्रसंचालन पतसंस्थेचे संचालक संजयकुमार सपकाळ यांनी अत्यंत उत्कृष्ट पद्धतीने सादर केले. पतसंस्थेच्यावतीने व्हा. चेअरमन शांतीलाल मुनोत यांनी आभार प्रदर्शन करुन राष्ट्रगीताने सभेची सांगता करण्यात आली. नंतर आलेल्या सभासदांना संस्थेने सुरुची भोजनाची व्यवस्था केली होती.

सभेस व्हा.चेअरमन शांतीलाल माणकचंद मुनोत, संचालक प्रकाशलाल मांगीलाल चोरडिया, रतिलाल सिमरतमल गुगळे, राजेंद्र नवलमल शिंगवी, संजयकुमार माधवराव सपकाळ, बिपीनचंद्र बन्सीलाल लुणिया, कांतीलाल मोतीलाल बोरा, विनोद बन्सीलाल भंडारी, नितीन पोपटलाल शिंगवी, सुशील सुंदरलाल भंडारी, पवन सुरेश गुंदेचा, संजय (सनी) शांतीलाल मुनोत, सुदाम तुळशीराम गांधले, किरण प्रकाश पतके, संचालिका सौ. वैशाली वर्धमान बोरा, सौ. अंजली नितीन शिंगवी व व्यवस्थापक राजेंद्र लालचंद मेहेर व संस्थेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.





राष्ट्रीय रंगोत्सव सेलिब्रेशनच्या स्पर्धेत यश मिळविलेले माऊंट सिनाय कॉन्व्हेंट स्कूलचे विद्यार्थी.

# राष्ट्रीय रंगोत्सव सेलिब्रेशनच्या स्पर्धेत माऊंट सिनाय कॉन्व्हेंट स्कूलचे यश

नगर – सारोळा बद्दी येथील माऊंट सिनाय कॉन्व्हेंट स्कूलच्या विद्यार्थ्यांनी मुंबई येथील रंगोत्सव सेलिब्रेशन या संस्थेने आयोजित केलेल्या राष्ट्रीय पातळीवरील रंगभरण व हस्ताक्षर स्पर्धेत स्पृहणीय यश संपादन केले. या स्पर्धेत एकूण ३४५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता.

रंगभरण स्पर्धेत इयत्ता पाचवीच्या रुद्र गुंड ह्याने चतुर्थ क्रमांकाचे पारितोषिक तर इयत्ता चौथीच्या कार्तिक लबडे याने आर्ट मेरीट पारितोषिक प्राप्त केले. त्याचप्रमाणे इयत्ता आठवीच्या श्रावणी म्हस्के हिने हस्ताक्षर स्पर्धेतील एक्सलंट एफर्ट वॉर्ड पटकाविले. एकूण ४४ विद्यार्थ्यांनी सुवर्ण पदके, २८ विद्यार्थ्यांनी रौप्य पदके व १७ विद्यार्थ्यांनी कांस्य पदके प्राप्त केली असून या सर्वांची आंतरराष्ट्रीय पातळीवरील कला स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या सर्व विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या समन्वयक नेहा केदारे यांचे मार्गदर्शन लाभले. मुख्याध्यापिका जयश्री खरात यांचे हस्ते सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना पदके व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

# पंडित दीनदयाल उपाध्याय जयंतीनिमित्त २५ सप्टेंबर रोजी जिल्ह्यात विविध स्पर्धा



नगर – पंडित दीनदयाल उपाध्याय यांचा लोककल्याणकारी आदर्श जीवनपट, राष्ट्रासाठी दिलेले योगदान युवा पिढीला समजावे आणि त्याद्वारे प्रेरणा घेऊन युवकांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जयंती निमित्त २५ सप्टेंबर रोजी जिल्ह्यातील सर्व चौदा तालुक्यात जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखालील समिती मार्फत महाविद्यालयीन निबंध, वक्तृत्व आणि पोस्टर सादरीकरण स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात युवकांनी सहभागी व्हावे असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

या निमित्ताने वर्षभर विविध उपक्रम राबविण्यासाठी जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीत सर्वश्री राष्ट्रीय स्वयंसेवक संघांचे महाराष्ट्र राज्य वैचारिक प्रबोधन प्रमुख रविंद्र मुळे, विनायक देशमुख, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अहिल्यानगर उपकेंद्राचे सहाय्यक कुलसचिव डॉ. शिवप्रसाद घालमे, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी सुनील शिंदे यांच्यासह चौदा तालुक्यात नियुक्त करण्यात आलेल्या समन्वयकांचा समावेश आहे.

या स्पर्धेत सहभागी युवकांनी पंडित दीनदयाल उपाध्याय यांना केंद्रस्थानी ठेऊन निबंध, वक्तृत्व आणि पोस्टर सादरीकरण करावे. तालुकास्तरीय स्पर्धेतुन तीनही स्पर्धेतील प्रथम ३ क्रमांक यानुसार एकुण ९ स्पर्धक जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवडले जातील. या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन समितीने केले आहे.

# गरमागरम पेस्तो पास्ता



**झटपट रेसिपी**

दोस्तांनो, पास्ता खाण्यासाठी रेस्टॉरंटमध्ये जाण्याची गरज नाही. तुम्ही घरच्या घरीच पेस्तो पास्ता बनवू शकता. या निमित्ताने मित्रमंडळींसोबत मस्त पास्ता पार्टीही करता येईल.

सामग्री: तीन कप पास्ता, चमचाभर ऑलिव्ह ऑईल, एक चमचा लसूण पेस्ट, एक सिमला मिरची, अर्धा कप फ्रेश क्रीम, पाव कप दूध, चमचाभर चिली फ्लेक्स, किसलेलं चीझ, मीठ.

पेस्तो सॉससाठी- पाव कप अक्रोड, वाटीभर बासिल, तीन चमचे ऑलिव्ह ऑईल, दोन लसूण पाकळ्या

कृती: पेस्तो सॉस बनवण्यासाठी सर्व घटक मिक्सरच्या भांड्यात घालून वाटून घ्या. पास्ता उकडून घ्या. आता एका कढईत ऑलिव्ह ऑईल घाला. थोडं गरम झाल्यावर त्यात लसूण पेस्ट घालून थोडं परतून घ्या. मग चिरलेली सिमला मिरची घालून परता. आता त्यात पेस्तो सॉस, फ्रेश क्रीम, दूध, चिली फ्लेक्स आणि मीठ घाला. दोन मिनिटं ढवळत रहा. यानंतर त्यात उकडलेला पास्ता घालून हलवून घ्या. दोन मिनिटं शिजू द्या. वरून किसलेलं चीझ घाला. गरमागरम खा.

# जोश

## शेर की जुबानी

मंजिल का नाराज होना भी जायज था। हम भी तो अजनबी राहों से दिल लगा बैठे थे।

तुम नजर नहीं आते तो आजकल शाम नहीं ढलती। बस उदास सा है सबकुछ, दिल से दिल की बात नहीं निकलती।

मन का कोई कोना अंधेरे में ना रहे, एक चिराग भीतर भी जलाओ यारों।

# मोठी नोकरी सोडून नफ्याची शेती



**अचिव्हर**

शेती हा आतबट्ट्याचा व्यवसाय म्हणून ओळखला जातो. शेतात धाडसी प्रयोग करायला अनेकजण धजत नाहीत. पण विनित पटेल हा तरुण त्याला अपवाद ठरला. त्याने आठ लाख वार्षिक पगार असलेली नोकरी सोडली आणि शेतीत विविध प्रयोग केले. सुरुवातीला अपयश आले; पण त्याने तो खचला नाही. बाजाराचा नीट अभ्यास केल्यानंतर त्याने शेतात काही पिकांचे उत्पादन घ्यायला सुरुवात केली. आज तो वार्षिक २४ लाखांची कमाई करत आहे. त्याने गावातील २५ जणांना रोजगारही दिला आहे.

मध्य प्रदेशमधील बालाघाट जिल्हातील परसवाडा तहसीलअंतर्गत अरंडिया हे गाव आहे. येथे राहणारा विनीत पटेल अभियंता म्हणून नोकरी करत होता. त्याला वार्षिक आठ लाख रुपये पगार होता; पण त्याचे या नोकरीत मन लागेना. मग त्याने नोकरीला रामराम ठोकला आणि गावाकडे आला. त्याचे वडील संपत पटेल हे पारंपारिक शेती करत होते. शेतात धान, गव्हू आणि हरभऱ्याची शेती होत होती; पण विनीतने नवीन प्रयोग केला. त्याने चारही हंगामात येणाऱ्या वेलवर्गीय पिकांची लागवड केली. काकडी, भोपळा, कारले, दुधी भोपळा आणि इतर हंगामी पालेभाज्यांचीही शेती त्याने सुरू केली.

विनीत सहा एकर शेती करतो. तो सध्या प्रति एकर चार लाखांहून अधिकची कमाई करत आहे. स्थानिक आणि इतर राज्यातील बाजारपेठेतील रोजच्या भावांचे तो सकाळीच अपडेट घेतो. कोणत्या बाजारपेठेत काय दर आहे, याचा अंदाज घेण्यासाठी त्याने अनेक ठिकाणी व्यापारी आणि भाजी विक्रेत्यांशी संपर्क ठेवला आहे. त्या माध्यमातून त्याला चांगली किंमत मिळते. वर्षभरात त्याची कमाई १८ ते २४ लाखांच्या घरात पोहचली आहे.

विनीतने अगोदर शेतीचे तंत्र समजून घेतले. त्यानंतर बाजारपेठांचा अभ्यास केला. त्यासोबतच शेतीतज्ज्ञ, शेतकी शाळेतील विद्यार्थी, शिक्षक यांच्याशी संपर्क वाढवला. परिसरातील प्रयोगशील आणि अनुभवी शेतकऱ्यांकडून बरीच माहिती घेतली. त्यानंतर संकरीत आणि देशी वाण, त्यांची गुणवत्ता, त्यांना लागणारा खर्च, आंतरमशागत, आंतरपीक पद्धत आणि पाणी व्यवस्थापन याचा अभ्यास आणि अंमलबजावणी केली. त्यातून यश हाती आले. तो आता पशूपालन करण्याचा विचार करत आहे.

# आईसोबत खटके उडतात!



**मॅच मेकींग**

गेल्या दोन वर्षांपासून मी एका मुलीच्या प्रेमात आहे. आम्ही दोघं सध्या पीएचडी करत असून वर्षभरापासून लिव्ह इन रिलेशनशीपमध्ये आहोत. माझ्या आईला आमचं असं 'लिव्ह इन' मध्ये रहाणं पसंत नाही. माझे तिच्यासोबत खटके उडतात. मी तीन वर्षांचा असताना माझ्या पालकांचा घटस्फोट झाला. त्यानंतर तिनेच मला वाढवलं. सध्या मी शिकतोय. त्यामुळे माझ्या शिक्षणाचा खर्च तीच उचलते आहे. पण मी लिव्ह इनमध्ये रहायला सुरूवात केल्यापासून ती सारखी माझ्यावर चिडते. दुसरीकडे माझी मैत्रीणही विचित्रच आहे. आम्ही काही काळ आमच्या कुटुंबासोबत राहून आलो की आमच्यात मतभेद होतात. त्यातच माझी मैत्रीण खूप रागीट आहे. ती नेहमीच माझ्यावर हक्क गाजवण्याचा प्रयत्न करते. आई आणि मैत्रीण यांच्यामध्ये मी अडकून पडलोय. मला नैराश्य आलंय आणि काय करावं ते कळत नाही. मला मार्गदर्शन करा.

उत्तर : 'लिव्ह इन रिलेशनशीप' ही पूर्णपणे आधुनिक संकल्पना आहे. 'लिव्ह इन' म्हटलं की भल्याभल्यांचे डोळे विस्फारतात. आधीच्या पिढीला तर ही बाब फारशी मान्य होणार नाही. तसंच ही संकल्पना आपल्या भारतीय संस्कृतीत बसत नाही. त्यामुळे तुझ्या आईला लिव्ह इन रिलेशनशीप ही संकल्पना मान्य नसणं अगदी स्वाभाविक आहे. या नात्याबद्दल तू तिला सांग. तुझ्या भविष्यातल्या योजनांची माहिती दे. आई आणि पत्नी/मैत्रीण यांना जोडणारा धागा तूच आहेस. दोघींच्या कलाने घेऊन त्यांना समजावून सांग. शेवटी प्रत्येकाला आपल्या पद्धतीने जगण्याचा अधिकार आहे. पण इतरांची मतंही ऐकून घे.

# विकसित भारत रोजगार योजनेचा तरुणांना आधार



**नोकरी हवीये?**

पंतप्रधान विकसित भारत रोजगार ही एक लाख कोटी रुपयांची योजना सरकारने लागू केली आहे. या योजनेअंतर्गत, खासगी कंपन्यांमध्ये पहिली नोकरी मिळवणाऱ्या तरुणांना सरकारकडून १५ हजार रुपयांची प्रोत्साहन रक्कम दिली जाईल.

या योजनेअंतर्गत, दोन वर्षांच्या कालावधीत देशात साडेतीन कोटींहून अधिक रोजगारनिर्मितीला प्रोत्साहन दिले जाणार आहे. यापैकी एक कोटी ९२ लाख लाभार्थी हे प्रथमच कामगार क्षेत्रात प्रवेश करतील. 'ईपीएफओ'मध्ये पहिल्यांदा नोंदणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना १५ हजार रुपये प्रोत्साहन रक्कम दिली जाईल. एक लाख रुपयांपर्यंत पगार असलेले कर्मचारी यासाठी पात्र असतील.

या योजनेअंतर्गत पहिला हप्ता सहा महिन्यांच्या सेवेनंतर आणि दुसरा हप्ता हा बारा महिन्यांच्या सेवेनंतर म्हणजेच एक वर्षानंतर आणि कर्मचाऱ्याने आर्थिक साक्षरता कार्यक्रम पूर्ण केल्यानंतर देण्यात येईल. बचत करण्याच्या सवयीला प्रोत्साहन देण्यासाठी या प्रोत्साहन राशीचा एक भाग हा बचत (सेव्हिंग अकाऊंट) खाते किंवा ठेव खात्यात निश्चित कालावधीसाठी ठेवला जाईल. नंतरच्या काळात कर्मचारी ते पैसे काढू शकतील.

## टेक्नो टॉक

### भारतात चालकविरहीत बससेवा



भारतीय तंत्रज्ञान संस्थे (आयआयटी, हैदराबाद) ने आपल्या कॅम्पसमध्ये देशातील पहिली पूर्णपणे कृत्रिम प्रज्ञेवर चालणारी ड्रायव्हरलेस बस सेवा सुरू केली आहे. टेक्नोलॉजी इनोव्हेशन हब ऑन ऑटोनॉमस नेव्हिगेशन या केंद्रात तयार करण्यात आलेल्या या बस स्मार्ट मोबिलिटीचा नवा अध्याय आहेत. या अत्याधुनिक बसमुळे केवळ कॅम्पसमधील प्रवास सोपा होणार नाही, तर भारतातल्या ऑटोनॉमस व्हेईकल क्षेत्रातही नवे युग सुरू झाले आहे.

'तिहान'च्या प्रो. पी. राजलक्ष्मी यांच्या नेतृत्वाखालील टीमने या चालक विरहित बसचे यशस्वी डिझाइन करण्यात आले आहे. हा प्रोजेक्ट सर्वसामान्यांसाठी खुला करण्यात आल्यानंतर अवघ्या काही महिन्यांमध्ये दहा हजारांहून अधिक प्रवाशांनी या बसमधून प्रवासाचा अनुभव घेतला. त्यापैकी नव्वद टक्क्यांहून अधिकजणांनी त्याबाबत समाधान व्यक्त केले. सहा सीटर आणि १४-सीटर अशा दोन प्रकारांमध्ये या ड्रायव्हरलेस बस उपलब्ध आहेत. यामध्य अडथळा ओळखणारी यंत्रणा असल्यामुळे प्रवास अधिक सुरक्षित बनतो. बस आपल्या मार्गावर अचानक समोर येणाऱ्या व्यक्ती, वाहन किंवा अडथळ्याची जाणीव करून आपली गती आपोआप कमी-जास्त करू शकते. या तंत्रज्ञानाला सुरक्षिततेचे प्रमाणपत्र मिळाले आहे. म्हणजेच या बसची चाचणी भारतीय रस्त्यांवर यशस्वीरीत्या पार पडली आहे. हा प्रकल्प फक्त आयआयटी कॅम्पसपुरता मर्यादित नसून आता देशात अन्यत्रही विकसित होत आहे. या सुविधेमुळे देशातील कंपन्या आणि संशोधन संस्थांना आवश्यक डेटा आणि इन्फ्रास्ट्रक्चर मिळणार आहे. याचबरोबर 'तिहान'द्वारे 'एआय' आणि 'मशिन लर्निंग' क्षेत्रात नवे इनोव्हेटर्स तयार करण्यावर भर दिला जात आहे. विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रशिक्षण मोड्यूल तयार केले जात असून, भविष्यात भारताला या क्षेत्रामध्ये सक्षम बनवणे हे यामागील प्रमुख उद्दिष्ट आहे.

# डेनिम शर्टचा स्टायलिश अंदाज

**फॅशन पॅशन**

दोस्तांनो, एक डेनिम शर्ट तुमचा लूक पूर्णपणे बदलू शकतो. तुम्ही हा शर्ट वेगवेगळ्या पद्धतीने कॅरी करू शकता. शर्ट एकच असला तरी वेगवेगळे लूक मिळवू शकता. चला तर मग डेनिमचा हा शर्ट कसा कॅरी करायचा ते पाहु या.



* नेहमीचा पांढरा शर्ट ठेवा बाजूला आणि डेनिम शर्टने कूल लूक मिळवा. कोणत्याही रंगाच्या चिनोजवर हा शर्ट कॅरी करता येईल. यासोबत व्हाईट स्नीकर्स घाला. स्टार्ट अपचे मालक कॅज्युअल मिटगला हा लूक कॅरी करू शकतात. यासोबतच डिनर क्वा कॅज्युअल पार्टीलाही तुम्ही डेनिम शर्ट घालू शकता.

* डेनिम शर्ट आणि शॉर्टस हे कॉम्बिनेशनही छान दिसतं. तुम्ही न्यूट्रल रंगाची शॉर्टस विकत घ्या. त्यावर डेनिम शर्ट घाला. यासोबत ब्राउन रंगाच्या लोफर्स शोभून दिसतील. कॅज्युअल आउटिंगला हा लूक कॅरी करा.

* सौम्य रंगाचा डेनिम शर्ट आणि डार्क ब्लू जीन्स कॅरी करून डेनिम ऑन डेनिम लूक मिरवता येईल.

* डेनिम शर्टचा वापर लेअरिंगसाठीही करता येईल. पांढरा टी शर्ट त्यावर डेनिम शर्ट आणि ब्लॅक जीन्स हा पेहराव झक्कास दिसेल.

* काळ्या फॉर्मल पँटवर डेनिम शर्ट उठून दिसतो.

* मिक्स अँड मॅचचं तंत्र फक्त मुलींपुरतं मर्यादित नाही. मुलंही आता अशी फॅशन करत आहेत. डेनिम शर्ट ब्लेझर पँटसोबतही कॅरी करता येईल.

# व्यायामानंतरही का वाढतं वजन?



**फिटनेस फंडा**

दोस्तांनो, आपण व्यायाम सुरु करतो. व्यायाम सुरू केल्यानंतर खरं तर वजन कमी व्हायला हवं. पण सुरूवातीच्या टप्प्यात ते वाढलेलं दिसतं. व्यायाम सुरू केल्यानंतर साधारण आठवडाभरातच वजन कमी व्हावं अशी आपली अपेक्षा असते. मग आपण वजन काट्यावर उभे राहतो आणि आधीपेक्षा वाढलेलं वजन बघून आपले डोळे विस्फारतात. व्यायाम सुरु केल्यानंतर का वाढतं वजन? जाणून घेऊ.

* व्यायाम सुरू केल्यानंतर स्नायूंमध्ये वेदना जाणवतात. स्नायूंमधल्या टिश्यूंवर ताण आल्याने असं होतं. व्यायाम सुरू केल्यानंतर एक-दोन दिवसांनी हा त्रास सुरू होतो. यामुळे वजन थोडं वाढू शकतं. स्नायूंमधल्या या वेदना तात्पुरत्या स्वरूपाच्या असतात आणि साधारण दोन आठवड्यांनी थांबतात.

* नव्या व्यायामाला सुरूवात केल्यानंतर स्नायू बचावात्मक पवित्रा घेतात. या टप्प्यात शरीरात पाणी साठून राहू शकतं. यामुळे स्नायू सुजल्यासारखे वाटतात. शरीरात पाणी साठून राहिल्याने वजन वाढतं.

* स्नायूंमध्ये पेशींसह पाणीही असतं. व्यायामाला सुरुवात केल्यानंतर स्नायूंचा आणि त्यातही पायाच्या स्नायूंसारख्या मोठ्या आकाराच्या स्नायूंचा आकार वाढू लागतो. पण फॅट्सच्या तुलनेत स्नायू कमी जागा व्यापतात. त्यामुळे वजन वाढलं तरी तुम्ही बारीक दिसता. अर्थात ही वजनवाढ वाईट नसते. उलट तुम्ही आधीपेक्षा जास्त तंदुरुस्त होता.

## मोबाईल मॅनिया

### सर्वत्र मिनी थ्रीडी कलेक्टेबल इमेजेस



इंस्टाग्राम स्टोरी असो किंवा व्हॉट्सअॅप स्टेटस, अलिकडे सर्वत्र मिनी थ्रीडी कलेक्टेबल इमेजेस (नॅनो बनाना ३डी फिगरिन) पहायला मिळत आहेत. सेलिब्रिटींपासून सामान्य लोकांपर्यंत सर्वजण या ट्रेंडमध्ये सहभागी होत आहेत. त्याबाबतची खास गोष्ट म्हणजे ती कोणत्याही तांत्रिक कौशल्याशिवाय बनवता येते आणि त्यासाठी पैसे खर्च करावे लागत नाहीत, म्हणूनच लोक त्यांच्या थ्रीडी इमेजेस तयार करून शेअर करत आहेत.

गुगलच्या जेमिनी २.५ फ्लॅश इमेज टूलला 'नॅनो बनाना' असे नाव देण्यात आले आहे. हे टूल खऱ्या इमेजसारखी दिसणारी ३डी इमेज तयार करू शकते. तुम्हाला नॅनो बनाना ३डी फिगरिन बनवायची असेल, तर जेमिनी अॅप किंवा वेबसाइटची मदत घ्यावी लागेल. इमेज तयार करण्यासाठी गुगल जेमिनीच्या अॅप किंवा वेबसाइटवर जा आणि तुमची इमेज अपलोड करा. यानंतर, ३डी फिगरिन बनवण्यासाठी प्रॉम्प्ट एंटर करावा लागेल. यासाठी गुगलने एक्सवर एक नमुना प्रॉम्प्ट शेअर केला आहे. प्रॉम्प्ट दिल्यानंतर काही वेळातच तुमच्यासाठी एक थ्रीडी फिगरिन तयार होईल.

थ्री डी फिगरिन व्हिडीओमध्ये रूपांतरित करण्याचा एक सोपा आणि विनामूल्य मार्ग आहे. ग्रॉक एआय यासाठी मदत करू शकते. यासाठी ग्रॉक एआयचे अॅप उघडा. त्यात 'थ्री डी फिगरिन' अपलोड करा आणि प्रॉम्प्टमध्ये मेक व्हिडीओ असे लिहा. काही सेकंदात, तुमचा व्हिडीओ साउंड क्लिपसह तयार होईल. तुम्ही तो रिफाइन करू शकता किंवा तुम्हाला आवडत असल्यास फोनमध्ये सेव्ह करू शकता. दुसरा मार्ग म्हणजे क्लिंग एआयच्या वेबसाइट किंवा अॅपवर जा आणि साइन इन करा. आता डाव्या कोपऱ्यात दिसणाऱ्या व्हिडीओ पर्यायावर टॅप करा. आता तुम्हाला इमेज अपलोड करण्यास सांगितले जाईल. बॉक्समध्ये इमेज अपलोड करा आणि व्हिडीओ जनरेट करण्यासाठी प्रॉम्प्ट लिहा. काही सेकंदात व्हिडीओ तुमच्यासमोर येईल.

# कारकिर्दीसाठी वेगळे पर्याय




**करीअरवेध**

पूर्वी डॉक्टर किंवा इंजिनीयर झाले म्हणजे चांगल्या पगाराची नोकरी मिळणार असे सर्रास मानले जायचे; पण आता स्वतःची ओळख निर्माण करण्याचे अनेक मार्ग उपलब्ध आहेत. त्यामुळे चांगले पैसेदेखील मिळतात आणि ओळखदेखील तयार होते. आजच्या काळात तुम्ही आयआयटी किंवा नीट उत्तीर्ण झाला नसलात तरी निराश होण्याची गरज नाही. आजच्या युगात, कारकिर्दीचे असे अनेक पर्याय आहेत, जे कौशल्य आणि सर्जनशील विचारांना प्राधान्य देतात.

*** डिजाइन :**

आता वेबसाइट किंवा अॅप फक्त काम करण्यासाठी नाही, तर त्यांचा लूकदेखील (यूजर एक्सपिरियन्स आणि यूजर इंटरफ`स) चांगला हवा असतो. डिझायनर्स हेच काम करतात. टेक कंपन्यांपासून ई-कॉमर्स आणि फिनटेक स्टार्टअप्सपर्यंत सर्वत्र त्यांची आवश्यकता आहे. या क्षेत्रात सुरुवातीचा पगार दर वर्षी सहा ते दहा लाख रुपये असू शकतो. कामात पारंगत झाल्यावर तुम्ही २० ते २५ लाख रुपये कमवू शकता.

***डिजिटल मार्केटिंग :**

आजच्या जगात कंपन्यांपासून नेत्यांपर्यंत सर्वांना डिजिटल स्पेसची गरज भासते. एसइओ, पेड जाहिराती, कंटेंट स्ट्रॅटेजी आणि सोशल मीडिया ट्रेंड समजून घेणाऱ्या डिजिटल मार्केटर्सना आज मोठी मागणी आहे. या क्षेत्रात फ्रेशर्सना पाच ते आठ लाख रुपये पगार मिळू शकतो आणि तज्ज्ञ पातळीवर ते वीस लाख रुपयांपर्यंत कमावू शकता.

***एथिकल हैकिंग आणि सायबर सुरक्षा :**

जग ऑनलाइन होत असताना सायबर सुरक्षेची मागणीदेखील वाढत आहे. कंपन्या नैतिक हॅकर्सना कामावर ठेवतात, जेणेकरून ते खऱ्या हॅकर्सच्या आधी त्यांच्या सिस्टीममधील कमतरता शोधू शकतात. या क्षेत्रात फ्रेशर्सना वार्षिक आठ ते दहा लाख रुपये पगार मिळू शकतो आणि तज्ज्ञ पातळीवर तीस लाख रुपयांपर्यंत कमावता येतात.

*** ॲनीमेशन आणि गेम डिझाइन :**

ओटीटी, गेमिंग अॅप्स आणि व्हर्च्युअल रियलिटीने ॲनिमेशन आणि व्हीएफएक्स इंडस्ट्री उच्च शिखरावर नेले आहे. यामध्येदेखील उत्तम करियर घडू शकते. सुरुवातीली तुम्ही वर्षाला चार ते आठ लाख रुपये कमवू लागता. पोर्टफोलिओ चांगला असेल तर पुढे तुम्ही १५ लाख रुपये किंवा त्याहून अधिक कमवू शकता.

*** सायकॉलोजी आणि मानसिक आरोग्य :**

आता लोक मानसिक आरोग्याबद्दल जागरूक होत आहेत. शाळा, कार्यालय, रुग्णालय किंवा खासगी थेरपी क्लिनिक, सर्वत्र मानसशास्त्रज्ञांना मोठी मागणी आहे.

# भोपाळजवळची प्रेक्षणीय हिल स्टेशन्स



**भटकंती**

भारतात भन्नाट भटकंतीसाठी अनेक ठिकाणे आहेत. ऐतिहासिक किंवा निसर्गाच्या सानिध्यात शांततेत वेळ घालवण्यासाठी अनेकजण या ठिकाणांना भेट देण्यासाठी जात असतात. हिल स्टेशन्सदेखील जगभरातील लाखो पर्यटकांना आकर्षित करतात. मध्य प्रदेशची राजधानी असलेल्या भोपाळ शहराच्या आसपास अनेक सुंदर हिल स्टेशन्स आणि पर्यटनस्थळे आहेत. ती स्वर्गापेक्षा कमी नाहीत! येथील हिरवळ, धबधबे, ऐतिहासिक किल्ले आणि धार्मिक स्थळे पर्यटकांना एक वेगळच अनुभव देतात.

*पंचमढी

भोपाळपासून सुमारे २०६ किलोमीटर अंतरावर असलेल्या पंचमढीला सातपुड्याची राणी म्हटले जाते. हे ठिकाण जोडप्यांसाठी, कुटुंबासाठी आणि मित्रांसाठी एक परिपूर्ण ठिकाण आहे. येथील बी फॉल्स, अप्सरा विहार आणि पांडव गुहा पर्यटकांना आकर्षित करतात. जवळच असलेल्या राष्ट्रीय उद्यानात तुम्हाला हिरवीगार निसर्ग, जंगले आणि वन्य प्राणी देखील पाहायला मिळतील.

पाताळकोट खोरे

पाताळकोट हे ठिकाण म्हणजे भोपाळपासून २५६ किलोमीटर अंतरावर असलेली एक दरी आहे, जी घनदाट जंगलांनी आणि उंच झाडांनी वेढलेली आहे. ट्रेकिंग आणि अॅडव्हेंचरची आवड असलेल्यांसाठी हे ठिकाण उत्तम आहे. येथे पोहोचल्यानंतर निसर्गाच्या कुशीत पोहोचल्याचा अनुभव येतो. जवळचे छिंदवाडा शहर स्थानिक पदार्थांची चव चाखण्यासाठी आणि भेट देण्यासाठी एक उत्तम ठिकाण आहे.

*मांडू

भोपाळपासून २८७ किलोमीटर अंतरावर असलेले मांडू हे जहाज महाल आणि प्राचीन वास्तुकलेसाठी प्रसिद्ध आहे. या ठिकाणाचे सौंदर्य पाहून एखाद्या युरोपीयन शहरात असल्याचा भास होतो. दोन तलावांच्या मध्ये बांधलेला जहाज महाल एखाद्या बोटीसारखा दिसतो आणि ही त्याची सर्वात मोठी खासियत आहे. मांडू हे त्याच्या ऐतिहासिक वारशामुळे आणि सुंदर बागांमुळे पर्यटकांचे आवडते ठिकाण बनलेलं आहे.

मायकेल हिल्स

भोपाळपासून २८५ किलोमीटर अंतरावर असलेल्या अमरकंटकजवळील मायकेल हिल्सवरून घनदाट जंगल आणि नद्यांचे अद्भूत दृश्य पाहता येईल. येथून नर्मदा आणि वनगंगा नद्यांचा संगम दिसतो. अमरकंटक शहर धार्मिक दृष्टिकोनातून देखील खूप खास आहे आणि वीकेंड गेटवेसाठी एक उत्तम पर्याय आहे.

*सांची स्तूप आणि भोजपूर मंदिर

नैसर्गिक सौंदर्याव्यतिरिक्त भोपाळमध्ये अनेक ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळेदेखील आहेत. तिसऱ्या शतकात सम्राट अशोक यांनी बांधलेल्या सांची स्तूप बौद्ध धर्माच्या प्रमुख स्मारकांमध्ये गणला जातो. भोपाळपासून ३२ किलोमीटर अंतरावर असलेल्या भोजपूर मंदिरात अपूर्ण असलेले जगातील सर्वात मोठे शिवलिंग आहे.

## 'स्नेहबंध' फौंडेशनच्या वतीने 'नवरात्र उत्सवानिमित्त' मुला मुलींसाठी जिल्हास्तरीय फॅन्सी ड्रेस स्पर्धा



नगर – स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने नवरात्र उत्सवानिमित्त जिल्हास्तरीय १२ वर्षाखालील मुला-मुलींसाठी फॅन्सी ड्रेस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ज्यांना सहभाग घ्यावयाचा आहे, त्यांनी आपले पूर्ण नाव, वय, पत्ता व मोबाईल नंबर २ ऑक्टोबर पर्यंत ८७ ९३ १९ १९ १९ या क्रमांकावर नुकताच मोबाईलवर काढलेला फोटो पाठवावा. पहिला गट वय १ ते ५ वर्षे व दुसरा गट ६ ते १२ वर्षे असा असेल. (फोटो जुना व फोटो कॅमेरा मधील फोटो चालणार नाही.)

स्नेहबंधचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली समिती परीक्षण करून दोन्ही गटातील पहिल्या ३ / ३ स्पर्धकांना गौरवण्यात येणार आहे.

मागील पारितोषिक विजेत्यांना स्पर्धेत प्रवेश नाही. स्पर्धेत प्रवेश मोफत आहे.

## नवरात्रोत्सवानिमित्त केडगाव देवीच्या दर्शनाला येणाऱ्या भाविकांची शिबिराद्वारे होणार 'मोफत आरोग्य तपासणी'

### स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानांतर्गत उपक्रम; समग्र परिवर्तन युवा बहुउद्देशीय संस्था व जय युवा अकॅडमीचा पुढाकार

नगर – शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त स्वस्थ नारी, सशक्त परिवार!, आरोग्य मोहिमेअंतर्गत केडगाव देवीला दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. समग्र परिवर्तन युवा बहुउद्देशीय संस्था, जय युवा अकॅडमीच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती समग्र परिवर्तनचे अध्यक्ष चंद्रकांत पाटोळे यांनी दिली.





२४ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर या कालावधीत केडगाव देवी रोड, एकता कॉलनी जवळ मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा रुग्णालय, महापालिका आरोग्य विभाग, जिल्हा परिषद आरोग्य विभाग, जिल्हा क्रीडा कार्यालय, मेरा युवा भारत, उमंग फाउंडेशन, सूर्या मॉर्निंग ग्रुप, फिनिक्स फाउंडेशन या संस्थांचा देखील या उपक्रमात सहभाग राहणार आहे.

महिलांची आरोग्य तपासणी, रक्ताच्या विविध तपासण्या, निसर्गोपचार (आयुष), हाडांची तपासणी, नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर, रक्तदान शिबिर आदींसह विविध आजारांची तपासणी व उपचार मोफत केले जाणार असल्याचे जय युवाचे अध्यक्ष ॲड. महेश शिंदे यांनी सांगितले.

केडगावला देवी दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## निमगाव वाघा येथील जगदंबा मातेच्या मंदिरात घटस्थापना

नगर – निमगाव वाघा (ता. नगर) येथे नवरात्रोत्सवानिमित्त जगदंबा मातेच्या मंदिरात विधीवत घटस्थापना करण्यात आली. तर गावात तुळजापूरच्या देवीच्या पालखीचे उत्साहात वाजत-गाजत स्वागत करण्यात आले. स्व.पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ व धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने विविध सामाजिक व धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मंदिरात देवीची पूजा करुन घटस्थापना करण्यात आली. यावेळी डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै.नाना डोंगरे, माजी सरपंच साहेबराव बोडखे, बाबा जाधव, गोरख चौरे, भास्कर कापसे, अरुण शिंदे, कुमार फलके, अरुण कापसे, शिवाजी जाधव, विजय पवार आदींसह भाविक उपस्थित होते.



निमगाव वाघा (ता. नगर) येथे नवरात्रोत्सवानिमित्त जगदंबा मातेच्या मंदिरात विधीवत घटस्थापना करण्यात आली. तर गावात तुळजापूरच्या देवीच्या पालखीचे उत्साहात वाजत-गाजत स्वागत करण्यात आले.

गावापासून दिड किलोमीटर लांब डोंगराच्या पायथ्याला जगदंब मातेचे मंदिर असून, पंढरपुरच्या विठ्ठल मंदिराच्या धर्तीवर या मंदिराचे जीर्णोध्दार करण्यात आले आहे. जागृत देवस्थान म्हणून मंदिराची ख्याती असून, नवरात्रोत्सवा निमित्त मंदिरात पंचक्रोशीतील भाविक दर्शनास येतात. नवरात्रीनिमित्त मंदिराला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

स्व.पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ व धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने नवरात्रोत्सवात महिला सक्षमीकरण, महिलांचा सन्मान सोहळा, मोफत आरोग्य शिबिर, मुलगी वाचवा... मुलगी शिकवा आणि युवकांसाठी व्यसनमुक्तीवर जनजागृतीवर उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती पै. नाना डोंगरे यांनी दिली. नवरात्र उत्सवानिमित्त गावात होणाऱ्या विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमास सरपंच उज्वलाताई कापसे यांचे सहकार्य लाभत आहे.

## बॉम्ब शोधक व नाशक पथकाकडून केडगाव देवी मंदिर परिसरात तपासणी

नगर – शारदीय नवरात्र उत्सवा निमित्त केडगाव येथील रेणुका माता मंदिरात दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होत असते. या पार्श्वभूमीवर खबरदारीचा उपाय म्हणून नगरच्या पोलीस दलातील बॉम्ब शोधक व नाशक पथकाकडून २३ सप्टेंबर रोजी मंदिर परिसरात कसून तपासणी करण्यात आली.

बॉम्ब शोधक व नाशक पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक अंबादास हुलगे, टेक्निशियन महेश शिंदे, सुभाष पठारे, संजय येठेकर, संदीप बडे, अजय कदम, देवेंद्र सगळगिळे, दिनेश पळसकर, शरद वर्पे यांच्या पथकाने बॉम्ब शोधक साहित्य व स्निपर श्वान लुसीचे मदतीने घातपात विरोधी तपासणी केली.



केडगाव देवी मंदिर परिसरात घातपात विरोधी तपासणी करताना पोलिसांचे बॉम्ब शोधक व नाशक पथक.

भाविकांनी व नागरिकांनी मंदिर व आजूबाजूच्या परिसरात काही आक्षेपार्ह वस्तू आढळून आल्यास तत्काळ पोलिसांशी संपर्क साधावा असे आवाहन यावेळी करण्यात आले.



एमआयडीसी नवनागापूर येथील श्री रेणुका माता देवस्थान येथे शारदीय नवरात्र उत्सवाची मंगल सुरुवात आ. संग्राम जगताप व माजी नगरसेविका सौ. शितलताई जगताप यांच्या हस्ते विधीवत पूजा व घटस्थापनेने झाली.

## एमआयडीसी येथील श्री रेणुका माता देवस्थानात घटस्थापना

### संबळ-डफच्या निनादात मातेचा जयघोष, मंदिर परिसरात रोषणाईची सजावट

नगर – एमआयडीसी नवनागापूर येथील श्री रेणुका माता देवस्थान येथे शारदीय नवरात्र उत्सवाची मंगल सुरुवात २२ सप्टेंबर रोजी आमदार संग्राम जगताप व माजी नगरसेविका सौ. शितलताई जगताप यांच्या हस्ते विधीवत पूजा व घटस्थापनेने झाली. यावेळी मंत्रोच्चार व धार्मिक विधीने वातावरण भक्तीमय बनले होते. घटस्थापने नंतर देवीची आरती करण्यात आली. या सोहळ्याला ट्रस्टचे अध्यक्ष प्रभाकर भोर, उपाध्यक्ष साहेबराव भोर, सचिव दत्तात्रय विटेकर, खजिनदार एकनाथ वाघ, विश्वस्त राजू भोर, विष्णू भोर, किरण सप्रे, गणेश कातोरे, महेश सप्रे, सचिन कोतकर आदींसह मनपाचे माजी सभापती कुमारसिंह वाकळे, गंगाधर वाकळे, लक्ष्मण गव्हाणे, आकाश कातोरे, बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. राजेश कातोरे, हनुमंत कातोरे, साहेबराव सप्रे, ज्ञानदेव सप्रे, पंकज वाकळे, महेश कांडेकर, किशोर भोर, अशोक बडे, विशाल गोरख कातोरे, सिताराम भोर आदी भाविक उपस्थित होते.

संबळ-डफच्या निनादात रेणुका मातेच्या जयघोषाने मंदिर परिसर दणाणून निघाला. मुंजोबा युवक मंडळाच्या तरुणांनी राशीन येथील देवीच्या मंदिरातून आणलेली पवित्र ज्योतचे स्वागत करण्यात आले. या ज्योतद्वारे आमदार जगताप यांच्या हस्ते मालदीप ज्योत प्रज्वलीत करण्यात आली.

उत्सवाच्या पहिल्याच दिवशी मंदिर परिसरात भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली. आरती, देवीच्या जयघोषांनी वातावरण अधिक मंगलमय झाले होते. यावेळी देवस्थानात आकर्षक विद्युत रोषणाई व फुलांच्या सजावटीने सौंदर्य खुलून दिसत आहे.

देवस्थानचे विश्वस्त गोरख कातोरे यांचे नुकतेच दुःखद निधन झाले असल्याने यावर्षी सामाजिक, सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमांना फाटा देण्यात आला आहे. मंदिरात केवळ धार्मिक विधी, पूजा-अर्चा व घटस्थापना सोहळेच पार पडणार असल्याची माहिती ट्रस्टचे अध्यक्ष प्रभाकर भोर यांनी दिली. नवरात्रोत्सवाच्या काळात दररोज होणाऱ्या आरत्या, धार्मिक कार्यक्रमांना भाविकांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिर ट्रस्टच्यावतीने करण्यात आले आहे.

## नेप्तीत तुळजापूर देवीच्या पालखीचे उत्साहात स्वागत

नगर – अहिल्यानगर तालुक्यातील नेप्ती येथे तुळजापूर देवीची पालखी दाखल होताच संबळाच्या कडकडाटात आई राजा उदो -उदोच्या गजरात हळद कुंकू व फुलाची उधळण करत ग्रामस्थांनी पालखीचे स्वागत केले. तुळजाभवानी मंदिरात तुळजाभवानी मातेची पालखी दर्शनासाठी ठेवण्यात आली होती, अशी माहिती रामदास फुले यांनी दिली आहे.



तुळजापूर देवीच्या पालखीचे नेप्तीत उत्साहात स्वागत करण्यात आले.

पालखी भल्या सकाळी आली असतानाही गावातील महिला भगिनी, अबालवृद्ध यांनी उपस्थित राहून दर्शन घेतले. गावात पालखी वाजत गाजत, फुलांची उधळण करत आणि फटाक्यांच्या आतषबाजीत दाखल झाली. या मिरवणुकीमुळे गावात भक्तीमय वातावरण निर्माण झाले. गावातील सर्वच जाती धर्माचे नागरिक या पालखी सोहळ्यात उपस्थित राहून पालखीचे दर्शन घेतले. पालखीची वस्ताद बाबासाहेब पवार यांच्या हस्ते पालखीची विधिवत पूजा करण्यात आली. तसेच गोंधळी पोपट जाधव, राहुल गवारे, बाबासाहेब जपकर, राजू कुलकर्णी, गणेश जपकर यांच्या हस्ते पालखीची आरती करण्यात आली.

गावात पालखी आणण्यासाठी ग्रामस्थांनी कमी वेळेत उत्तम नियोजन केले. यानिमित्ताने संपूर्ण गाव एकत्र आले होते. पालखीच्या आगमनानिमित्त ग्रामस्थांनी घरासमोर सडा टाकून सुंदर रांगोळ्या काढल्या होत्या.

भाविकांच्या मनातील इच्छा, आकांक्षा पूर्ण करण्याची सामर्थ्य तिच्यात आहे. नवसाला पावणारी ही माता प्रत्येकाच्या जीवनात सुख, समृद्धी आणि आनंदाचे सुवर्णक्षण घेऊन येते. आज नेप्ती गावात पालखीचे आगमन झाले आहे, हा सोहळा म्हणजे भक्ती, श्रद्धा आणि एकतेचे प्रतीक आहे. गावातील सर्व समाजबांधवांनी यात उत्साहाने सहभाग घेतला, हीच खरी तुळजाभवानी मातेची कृपा आहे. या पालखीमुळे गावात ऐक्याची भावना बळकट झाली आहे. देवीच्या चरणी प्रार्थना आहे . देवीच्या आशीर्वादामुळे नेप्ती गावच नव्हे तर संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यातील जनतेचे कल्याण होईल असे प्रतिपादन बाबासाहेब पवार यांनी केले.

यावेळी पालखीचे मुख्य मानकरी रवींद्र भगत, वस्ताद बाबासाहेब पवार, बाबासाहेब जपकर, राजू कुलकर्णी, रामदास फुले, लहानु गवारे, राहुल गवारे, रावसाहेब कर्पे, अतुल गवारे, गणेश जपकर, गोंधळी पोपट जाधव, बापू कोतकर, श्रीनिवास जपकर, रामदास गवारे, अंबादास जपकर, सहादू जपकर, बाजीराव जपकर, आयुष्य गवारे, रावसाहेब कोल्हे, रंगनाथ जपकर, गोरख जपकर, पोपट जपकर, शोभा पवार, मेघा पवार, आकाश पवार, पल्लवी गिरे, अंबाबाई चौगुले, शौर्य गिरे, कांताबाई पवार, विजय कर्पे, निखिल भगत, भाऊसाहेब भगत यांच्यासह परिसरातील भाविक उपस्थित होते.

## अहिल्यानगर शहरात २८ सप्टेंबरपर्यंत स्वरक्षण प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

### नवरात्रीत शौर्य जागर! हिंदु जनजागृती समितीचा 'आता फक्त लढायचे' उपक्रम

नगर – हिंदू जनजागृती समितीच्या वतीने या वर्षी नवरात्रोत्सवात महाराष्ट्र, गोवा आणि कर्नाटक राज्यांमध्ये 'आता फक्त लढायचे' हा विशेष शौर्य जागृती उपक्रम पंधरा वर्षावरील युवक-युवतींसाठी राबवण्यात येणार आहे. घटस्थापनेपासून चालणाऱ्या या उपक्रमात गावागावांतील आणि शहरातील युवक-युवतींना उपस्थित रहावे असे आवाहन हिंदु जनजागृती समितीच्या वतीने करण्यात आले आहे. मार्कंडेय संकुल, नेप्ती नाका, अहिल्यानगर येथे २३ ते २८ सप्टेंबर दरम्यान या साय.५.३० ते ७ यावेळेत शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी रामेश्वर भुकन यांच्याशी ८३२९३०२९५५ या मोबाईल नंबरवर संपर्क साधावा.

नवरात्र म्हणजे केवळ गरबा किंवा दांडिया खेळून साजरा करायचा उत्सव नव्हे, तर देवीने अनेक दैत्य आणि राक्षसांचा वध करून दाखवलेल्या शौर्याची उपासना करण्याची हीच खरी वेळ आहे. देवीने नऊ दिवस युद्ध करून महिषासुराचा वध केला. आज समाजात वावरणाऱ्या दुष्प्रवृत्ती आणि राक्षसी विचारांच्या लोकांपासून समाज व राष्ट्राचे रक्षण करण्यासाठी देवीच्या याच रणचंडी रूपाची उपासना करणे, ही काळाची गरज आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश युवक-युवतींना शौर्याचे प्रशिक्षण देऊन याच देवीची उपासना करण्यास प्रवृत्त करणे आहे.

### स्वरक्षण प्रशिक्षण

या सायंकालीन शिबिरांमध्ये युवक-युवतींना स्व-संरक्षणासाठी सिद्ध केले जाईल. यामध्ये लाठीकाठी, दंड साखळी (नानचाकू) यांसारख्या शस्त्रांचे मूलभूत प्रशिक्षण दिले जाईल, तसेच विविध स्वरक्षणाचे तंत्र शिकवले जाईल. या प्रशिक्षणातून आज महिलांवर आणि समाजावर होणाऱ्या विविध आघातांपासून स्वतःचे रक्षण कसे करावे, याचे प्रत्यक्ष ज्ञान दिले जाईल.



श्री रामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनचे सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल आणि मोहनलाल रामावतार मानधना कनिष्ठ महाविद्यालय नवरात्री उत्सव उत्साहात झाला.

## रामकृष्ण एज्युकेशनमध्ये नवरात्री उत्सव उत्साहात

नगर – श्री रामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनचे सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल आणि मोहनलाल रामावतार मानधना कनिष्ठ महाविद्यालय नवरात्री उत्सव उत्साहात झाला. नवरात्री उत्सवासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सौ. प्रतिभा श्रीगोपाल धूत होत्या. याच कार्यक्रमाचा भाग म्हणून इ. दुसरी व तिसरीच्या महिला पालकांसाठी फायरलेस कुकिंग स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेचे परीक्षक म्हणून लाभलेल्या सौ. रंजना बजरंग दरक, सौ. मंजू जगदीश झालानी, सौ. कोमल पराग मानधना यांचा सत्कार संस्थेचे सचिव डॉक्टर शरद कोलते यांनी केला.

या निमित्ताने विद्यालयात वेगवेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. इ. दुसरी व तिसरीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या जय अंबे जगदंबे माँ ! या गाण्याने सर्व वातावरण भक्तिमय केले. तसेच इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांनी आकर्षक दांडिया सादर केला व तिसरीच्या विद्यार्थ्यांनी देवीच्या विविध रूपाचे सुंदर सादरीकरण करून सर्वांची मने जिंकली.

फायरलेस कुकिंग या स्पर्धेचे पाल्यांच्या इयत्तेनुसार पालकांचे क्रमांक काढण्यात आले. इयत्ता दुसरी मधील पालकांमध्ये प्रथम क्र. सौ किमया विजय गुंदेचा, द्वितीय क्र.सौ दर्शना सुदीप झंवर, तृतीय क्र. सौ. निकिता आनंद भंडारी, उत्तेजनार्थ सौ. प्राजक्ता संदीप शेरे व इ. तिसरी मधून प्रथम क्र. सौ. रूपाली सुशांत जाधव, द्वितीय क्र.सौ. पायल योगेश तांदुळवाडकर, तृतीय क्र. सौ. आराध्या सागर कंदूर, उत्तेजनार्थ सौ. तृप्ती किशोर घाडगे नमस्ते यांनी पटकावला. यावेळी कार्यक्रमाला विद्यालयाच्या प्राचार्या सौ. राधिका जेऊरकर, उपप्राचार्या सौ. गगन वाधवा, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या संपदा देशपांडे उपस्थित होत्या.

माध्यमिक विभागाच्या समन्वयक सुषमा उजागरे यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाचे शिक्षक देखील उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रेयकुमार गुंडू यांनी केले. तसेच पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## पावसामुळे भिंगार येथील कलगीतुरा कार्यक्रम रद्द

नगर – गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे व हवामान खात्याने संपूर्ण जिल्ह्यासाठी जाहीर केलेल्या 'रेड अलर्ट' चा विचार करून भिंगार सरपण गल्ली येथे दरवर्षी नवरात्राच्या तिसऱ्या माळेला आयोजित केला जाणारा कलगीतुरा कार्यक्रम यंदा रद्द करण्यात आला आहे. २४ सप्टेंबर रोजी हा कार्यक्रम पार पडणार होता. परंतु प्रतिकूल हवामानाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षिततेच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आल्याचे कार्यक्रमाचे अध्यक्ष भाऊ कर्डिले यांनी सांगितले.

दरवर्षी या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातील नामवंत शाहीर तसेच हजारो रसिक उपस्थित राहतात. मात्र यंदा पावसाच्या अनिश्चिततेमुळे व आपत्ती व्यवस्थापनाचा विचार करून कार्यक्रम रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी येणारे शाहीर, कलाकार व श्रोते यांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन कर्डिले यांनी केले आहे.



रयत शिक्षण संस्थेच्या कापड बाजार येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील माध्यमिक व प्राथमिक विद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३८ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

## लक्ष्मीबाई भाऊराव पाटील विद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील जयंती साजरी

नगर – रयत शिक्षण संस्थेच्या कापड बाजार येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील माध्यमिक व प्राथमिक विद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३८ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. शाळेत कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या सौ. छायाताई काकडे तर प्रमुख उपस्थितीत प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. लक्ष्मीताई आहेर, माजी प्राचार्य अंगद काकडे, तसेच विद्यालयातील शिक्षक-शिक्षिका व विद्यार्थी उपस्थित होते.

प्रास्ताविकात मुख्याध्यापिका सौ. लक्ष्मीताई आहेर यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या समाजकारणातील योगदानाचा उल्लेख करून त्यांच्या कार्याची आठवण करून दिली. रयत शिक्षण संस्थेची स्थापना करून समाजातील वंचित घटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केलेले प्रयत्न आजही मार्गदर्शक असल्याचे ते म्हणाल्या.

प्राचार्या छायाताई काकडे म्हणाल्या की, कर्मवीर भाऊराव पाटील हे खऱ्या अर्थाने शिक्षणाचे संत होते. त्यांनी आयुष्यभर अस्पृश्यता, गरिबी आणि अशिक्षितपणा याविरुद्ध लढा दिला. स्वावलंबी शिक्षण हा त्यांचा मंत्र प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यात मार्गदर्शक ठरावा. त्यांनी सुरू केलेल्या रयत शिक्षण संस्थेमुळे ग्रामीण भागातील लाखो मुले-मुलींना शिक्षण मिळाले आणि त्यांचे भविष्य घडले. आज आपण जेव्हा शाळेत शिकतो, ज्ञान मिळवतो, तेव्हा या संस्थापकांच्या त्यागाचे स्मरण ठेवणे गरजेचे आहे. भाऊराव पाटील यांचे जीवन हे कष्ट, त्याग आणि सेवाभाव याचे प्रतीक आहे. त्यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून प्रत्येकाने शिक्षण घेऊन समाजासाठी योगदान देण्याचे त्यांनी आवाहन केले.

कार्यक्रमात शिक्षकांनी कर्मवीरांच्या कार्यावरील विचार मांडले.

